## राहुल गांधी हाजीर हो! नाशिकच्या न्यायालयाचे निर्देश



**नाशिक** : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याविषयी काढलेल्या अनुद्गारप्रकरणी काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी न्यायालयात हजर राहून जामीन घ्यावा, असे निर्देश नाशिकच्या न्यायालयाने दिले आहेत. राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रा काढली होती. या दरम्यान त्यांनी वर्धा येथे बोलताना स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा माफीवीर असा उल्लेख करून त्यांच्यावर टीका केली होती. त्या संदर्भात भावना दुखावल्याने नाशिकमधील सावरकरप्रेमी देवेंद्र भुतडा यांनी ॲड. मनोज पिंगळे यांच्यामार्फत नाशिकच्या न्यायालयात बदनामीचा दावा दाखल केला आहे. त्यावर शनिवारी (दि. १) सुनावणी झाली. या वेळी राहुल गांधी उपस्थित नव्हते. त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीचा अर्ज मंजूर करण्यात आला, मात्र जामीन घेण्यासाठी त्यांनी उपस्थित राहावे अशी मागणी अर्जदारांनी केली. ती मान्य करण्यात आली आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २२५
www.ramprahar.com
रविवार, २ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


युनिव्हर्सिटीच्या उत्तरपत्रिका चोरणारा जेरबंद/२

रविप्रहरमध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४

उरणच्या कराटेपटूंची चॅम्पियनशिपमध्ये चमक/८


### संतोष देशमुख हत्येप्रकरणी संपूर्ण पुराव्यानिशी दोषारोपपत्र दाखल

# आरोपींना कठोर शिक्षा मिळणार : मुख्यमंत्री

**ठाणे : प्रतिनिधी**

संतोष देशमुख हत्येप्रकरणी पोलीस सुरुवातीपासून कठोर तपास करीत आहेत. संपूर्ण पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांना नेमले आहे. त्यामुळे आरोपींना कठोरात कठोर शिक्षा मिळावी, असा प्रयत्न राहणार असल्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. ते शनिवारी (दि. १) ठाण्यात पत्रकारांशी बोलत होते.

ठाणे शहरात आयोजित ३५व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेच्या समारोप कार्यक्रमाला मुख्यमंत्री फडणवीस यांची शनिवारी उपस्थिती लाभली. या कार्यक्रमापूर्वी त्यांनी राज्यातील गुन्हे आणि कायदा सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीस गृहराज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, गृहराज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अप्पर मुख्य सचिव इकबाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे आदी उपस्थित आहेत.



अमली पदार्थाबाबत शुन्य सहनशीलता धोरण राबविले जात आहे. त्यामुळे या गुन्ह्यात कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याचा सहभाग आढळून आला, तर त्याला बडतर्फ केले जाईल, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिला.

# जापनीज इन्सेफेलाइटिस लसीकरण कार्यक्रमाचा पनवेलमध्ये प्रारंभ

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील १ ते १५ वर्ष वयोगटातील सर्व मुलांना जापनीज इन्सेफेलाइटिस लस अंगणवाडी, शासकीय, निमशासकीय, खासगी शाळांमध्ये तसेच शाळाबाह्य परिसरात मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. १) झाले.

पनवेल शहरातील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या लसीकरण कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभास उपायुक्त वैभव विधाते, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक गीते, बाल संगोपन अधिकारी डॉ. गणेश नायर, वैद्यकीय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, पशुवैद्यकीय अधिकारी भगवान गीते, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



या वेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, पोलिओसारख्या असाध्य रोगाच्या लसीकरणाच्या माध्यमातून मुक्त होण्याच्या दिशेने प्रवास झाला आहे. त्यासाठी अभियान राबविण्यात आले. त्याच पद्धतीने जापनीज इन्सेफेलाइटिसचे लसीकरण करण्याकरिता जनजागृती करून अभियान राबवून यावर मात करता येईल.

उपायुक्त डॉ. वैभव विधाते म्हणाले, या आजारावर आजतागायत कोणताही निश्चित अथवा ठोस उपाय उपलब्ध नसल्याने हा आजार होऊ नये याकरिता शासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून मोफत लस उपलब्ध केली आहे. नागरिकांनी या लसीकरणाचा लाभ घ्यावा.

जापनीज इन्सेफेलाइटिस हा एक मेंदुज्वर आजाराचा प्रकार आहे. तो डासांपासून पसरणाऱ्या विषाणूचा प्रकार आहे, जो लहान मुलांकरिता जीवघेणा ठरू शकतो. यामध्ये ३०% रुग्ण दगावले जाऊ शकतात, तर ४०% रुग्णांना कायमचे अपंगत्व येऊ शकते. जेई ही लस अत्यंत सुरक्षित असल्याने बालकांना या गंभीर आजारापासून सुरक्षित ठेवण्यासाठी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन डॉ. आनंद गोसावी यांनी केले.

### राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम २.०चेही उद्घाटन

निरोगी बालपण व सुरक्षित भविष्यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम २.० अंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील शाळा व अंगणवाडीतील मुला-मुलींची विनामूल्य आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. जन्मजात व इतर आजारांवर मोफत उपचार, संदर्भ सेवा व शस्त्रक्रिया होणार आहे. या कार्यक्रमाचेही शनिवारी उद्घाटन करण्यात आले. यासाठी पाच टीम तयार करण्यात आल्या असून शाळा व अंगणवाडीमधील मुला-मुलींची विनामूल्य आरोग्य तपासणी होईल.

# मंत्री गणेश नाईक यांचा जनता दरबार

### नागरिकांच्या निवेदनांवर तत्काळ कार्यवाही

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याचे वनेमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांचा नवी मुंबईतील दुसरा जनता दरबार शनिवारी (दि. १) वाशी येथील विष्णूदास भावे नाट्यगृहात झाला. शिक्षण, आरोग्य, नागरी सोयी-सुविधा, प्रशासकीय कारवाई व अन्य विषयांवर नागरिकांनी आपली निवेदने सादर केली. यापैकी ६५ टक्के निवेदनांवर तत्काळ कार्यवाही करून नागरिकांना दिलासा देण्यात आला.

पहिल्या जनता दरबारात पोलीस विभागाशी संबंधित ८५ निवेदने सादर करण्यात आली होती. पोलीस प्रशासनाने त्यावर जलद गतीने कार्यवाही करीत या प्रकरणांचा निपटारा केला आहे. नवी मुंबईनंतर पालघर आणि ठाणे येथे एक वेळा जनता दरबार झाला. नवी मुंबईतील पुढील जनता दरबार ४ एप्रिल रोजी, पालघर येथील जनता दरबार ७ एप्रिल रोजी, तर ठाण्यातील जनता दरबार ११ एप्रिलला आयोजित करण्यात आला आहे.



वाशी येथील जनता दरबाराला माजी खासदार संजीव नाईक यांच्यासह महापालिका, सिडको, एमआयडीसी, पोलीस, महसूल, परिवहन, वन विभागासह विविध शासकीय खात्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. २५० नागरिकांनी आपल्या समस्या, निवेदने मांडली. त्यापैकी अनेक समस्यांचे तत्काळ निराकरण संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांना सूचना करून करण्यात आले.

## लेखिका डॉ. मीना प्रभू यांचे निधन

**लंडन : वृत्तसंस्था**



प्रसिद्ध मराठी प्रवासवर्णनकार, कादंबरीकार आणि कवयित्री डॉ. मीना सुधाकर प्रभू यांचे निधन झाले आहे. त्या ८५ वर्षांच्या होत्या. गेल्या काही काळापासून त्या आजारी होत्या आणि त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान शनिवारी (दि. १) त्यांची प्राणज्योत मालवली.

डॉ. प्रभू या मूळच्या पुण्याच्या होत्या, पण विवाहानंतर लंडनमध्ये स्थायिक झाल्या. पेशाने भुलतज्ज्ञ असलेल्या डॉ. प्रभू यांनी आपल्या लेखनाने प्रवासवर्णनाला एक वेगळेच वलय प्राप्त करून दिले होते. प्रवास वर्णनकार म्हणून त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत.

## निवडक

### संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिकसह आठ जण आरोपी

**बीड** : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणासह एकूण तीन गुन्ह्यात सीआयडीने एकत्रित आरोपपत्र दाखल केले आहे. यात वाल्मिक कराड हाच याचा मुख्य सूत्रधार असल्याचे म्हटले गेले आहे. याशिवाय विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतिक घुले, जयराम चाटे, सुधीर सांगळे, सिद्धार्थ सोनवणे व कृष्णा आंधळे यांचा आरोपी म्हणून समवेश आहे. या प्रकरणातील आंधळे हा आरोपी फरार असून बाकी सर्व अटकेत आहेत.

### रखडलेल्या काँग्रेस विधीमंडळ पक्ष पदाधिकाऱ्यांच्या अखेर नियुक्त्या

**मुंबई** : काँग्रेस विधीमंडळ पक्ष पदाधिकाऱ्यांच्या रखडलेल्या नियुक्त्या अखेर करण्यात आल्या आहेत. यामध्ये विधानसभेतील उपनेतेपदी आमदार अमीन पटेल, मुख्य प्रतोदपदी माजी मंत्री आमदार अमित देशमुख, सचिवपदी आमदार विश्वजीत कदम, प्रतोदपदी शिरीषकुमार नाईक व संजय मेश्राम यांची; तर विधान परिषदेत गटनेतेपदी आमदार सतेज पाटील, मुख्य प्रतोदपदी आमदार अभिजीत वंजारी व प्रतोदपदी राजेश राठोड आहेत.

# कुडाच्या जागी पक्क्या घरांची पायाभरणी!

### सवणे खुटलवाडी येथे घरकुलांचे भूमिपूजन

### दमदार आमदार महेश बालदी यांची वचनपूर्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण मतदारसंघातील एकही आदिवासी बांधव हा कुडाच्या घरात राहणार नाही हा विधानसभा निवडणुकीत दिलेला शब्द पूर्ण करणार असल्याचा पुनरूच्चार आमदार महेश बालदी यांनी सवणे खुटलवाडी येथे १३७ घरकुलांच्या भूमिपूजनावेळी केला. त्याचप्रमाणे विकासकामासाठी निधीची कमतरता भासणार नाही, असाही शब्द दिला.

पनवेल पंचायत समिती अंतर्गत प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान पीएम जनमन योजनेंतर्गत चावणे ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासीवाड्यांमध्ये १३७ घरकुले मंजुर झाली आहेत. यामध्ये सवणेवाडीत २१, खुटलवाडीत ५४, पेरूचीवाडीत ५२ आणि कालिवलीवाडीमध्ये १० घरकुले उभारण्यात येणार आहेत. या सर्व घरकुलांचे भूमिपूजन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते शनिवारी (दि. १) सवणे खुटलवाडी येथे करण्यात आले. एकही आदिवासी कुटुंब कुडाच्या कच्च्या घरात राहणार नाही, असे आश्वासन आमदार महेश बालदी यांनी विधानसभा निवडणुकीत दिले होते. त्यानुसार त्यांच्या संकल्प कृतीचा पहिला टप्पा म्हणून घरकुलांची ही पायाभरणी करण्यात आली.







या वेळी आमदार महेश बालदी यांनी, आदिवासी कुटुंबाला पक्के घर असणे ही त्यांची मूलभूत गरज आहे. प्रत्येक लाभार्थ्याने हे घर बनविताना विशेष लक्ष देऊन ते पूर्ण करावे. दोन महिन्यांच्या आत घरकुलाचे काम पूर्ण करणार असाल, तर वैयक्तिक ११ हजार रुपयांची प्रति लाभार्थी मदत दिली जाणार असल्याची घोषणा केली तसेच उपस्थित पदाधिकाऱ्यांना आदिवासी बांधवांना घरकुल उभारण्यासाठी सहकार्य करण्याच्या सूचना देत विकासकामासाठी पैशाची कमी कधीच भासणार नाही, असे स्पष्ट केले.

गेल्या दहा वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येकाला स्वतःचे घर असावे यासाठी पंतप्रधान आवास योजना प्रभावीपणे राबवली. अन्न, वस्त्र, निवारा या मानवी गरज आहेत आणि प्रत्येक देशवासीयांच्या डोक्यावर निवारा असावा अशा प्रकारची भूमिका केंद्र सरकारने घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनानेसुद्धा याकरिता सकारात्मक पाऊल टाकत मोठ्या प्रमाणात गोरगरीब, गरजूंसाठी घरे बांधली आहेत.

काही दिवसांपूर्वी पंतप्रधान आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये मंजुरी पत्र आणि पहिला हप्ता देण्यात आला. पनवेल, उरण परिसरामध्ये आजही मोठ्या प्रमाणात आदिवासीवाड्या आहेत. लवकरच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टेकऑफ घेणार असताना या वाड्या-पाड्यांवरील घरे पक्की असावीत यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी विशेष प्रयत्न करीत आहेत.

भूमिपूजन समारंभास उपविभागीय अधिकारी पवन चांडक, प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रदीप सोळसकर, विस्तार अधिकारी संतोष ठोंबरे, मिनल कनोजे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर घरत, भाजपचे केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, संदीप पाटील, संजय टेंबे, ग्रामपंचायत अधिकारी विजय नलावडे, रत्नाकर घरत, भगवान देशमुख, दिनेश पाटील, माजी सरपंच किरण माळी, विजय मुरकुटे, योगेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य ललिता दखडा, निरज देशमुख, सुरेश देशमुख, राघो वाघ, उमेश सरदार, अभिषेक साठे, हनुमंत साठे, मधू वाघ, मंगल्या पवार, राजा पवार, शंकर पवार, चंद्रकांत पवार, राजा सोतावळे, प्रकाश कातकरी, संकेत पाटील, विजय नलावडे, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आदिवासी बंधू-भगिनी उपस्थित होते.

दरम्यान, घरकुलांचे काम मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणारे भगवान देशमुख आणि रत्नाकर घरत यांचा या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



**पनवेल : सुरत (गुजरात) येथे झालेल्या आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत उरण तालुक्यातील डोंगरी गावच्या आदित्य अनंत घरत याने चमकदार कामगिरी करीत चार सुवर्णपदके पटकावली. याबद्दल त्याचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, कमलाकर घरत, चंद्रकांत घरत, पनवेल आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष अतुल पाटील, सचिव सुनील पाटील, परिषदेच्या उरण तालुका अध्यक्ष सीमा घरत आदी उपस्थित होते.**

## चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आज भारत-न्यूझीलंड लढत

**दुबई** : भारतीय क्रिकेट संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये बांगलादेश आणि पाकिस्तानविरुद्धच्या लढती जिंकत उपांत्य फेरीत जागा निश्चित केली आहे. आता टीम इंडियाचा शेवटचा गट सामना रविवारी (दि. २) न्यूझीलंडविरुद्ध होणार आहे. भारताप्रमाणे न्यूझीलंडचेही सेमी फायनलमधील स्थान पक्के आहे. आता दोन्ही टीम विजयी अभियान कायम राखत पहिल्या क्रमांकासह सेमी फायनलमध्ये प्रवेशाचा प्रयत्न करतील.

दुबईत होणाऱ्या या मॅचमध्ये टीम इंडियामध्ये काही बदल होण्याची शक्यता आहे. कर्णधार रोहित शर्मा सध्या पूर्णपणे फिट नाही. त्यामुळे त्याला विश्रांती देण्याचा विचार संघ व्यवस्थापन करीत आहे. या परिस्थितीत ऋषभ पंत खेळू शकतो. रोहितप्रमाणेच अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला विश्रांती देण्याचा विचार संघ व्यवस्थापन करीत आहे. अर्थात, त्याचे कारण वेगळे आहे. न्यूझीलंडच्या संघात पाच डावखुरे फलंदाज आहेत. त्यामुळे टीम इंडिया या सामन्यात शमीच्या जागी डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगला खेळवू शकते.

# माथेरानची सफर रोप-वेने करता येणार

### प्रस्तावित प्रकल्पाला सरकारचा हिरवा कंदील

**नेरळ : दर्वेश पालकर**

स्वर्गवत वाटणारी माथेरानची सफर आता रोप-वेने करता येणार आहे. रोप-वेच्या प्रस्तावित प्रकल्पाला सरकारने हिरवा कंदील दाखवला असून हजारो पर्यटकांना थेट नेरळहून माथेरान गाठता येणार आहे. यामुळे माथेरानचे पर्यटन अधिकच बहरणार आहे.

(संग्रहित छायाचित्र)



थंड हवेसाठी प्रसिद्ध असलेल्या माथेरानमध्ये दरवर्षी १० लाखांहून अधिक पर्यटक येत असतात. केवळ वीकेण्डला हाच आकडा सात ते आठ हजारांच्या घरात असतो, पण एकच मार्ग आणि पुरेशी पार्किंग व्यवस्था नसल्याने माथेरानच्या घाटात वाहतूक कोंडी होते, तर कधी दरड कोसळण्याच्या घटना घडतात. यामुळे रस्ता ब्लॉक होत असल्याने इच्छा असूनही अनेकदा शेकडो पर्यटकांना माघारी फिरावे लागते. आता रोप-वे सुरू होणार असल्याने पर्यटकांना निसर्गाचा मनमुराद आनंद घेत थेट नेरळहून माथेरान गाठता येणार आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून हा प्रकल्प पूर्ण केला जाणार आहे.

### आशिया खंडातील सर्वात लांब प्रकल्प

*नेरळ ते माथेरान रस्ता मार्ग जवळपास ११ किमीचा आहे. वाहनाने माथेरान गाठण्यासाठी अर्धा तास लागतो, तर टॉय ट्रेनने तब्बल अडीच तास लागतात, परंतु रोप-वेमुळे हे अंतर काही मिनिटांतच पार करता येणार आहे. दरम्यान, हा प्रकल्प साकारल्यास तो आशिया खंडातील सर्वात लांब रोप-वे ठरणार आहे. केंद्राच्या राष्ट्रीय राज्य मार्ग लॉजिस्टीक व्यवस्थापन आणि पर्वतमाला योजनेंतर्गत राज्य सरकार एकूण ४५ रोप-वेची कामे हाती घेणार आहे. त्यात माथेरानच्या रोप-वे प्रकल्पाचा समावेश आहे.*

# युनिव्हर्सिटीच्या उत्तरपत्रिका चोरणारा जेरबंद

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या चिंचवली येथे तक्रारदार हे साईमंदीर येथे दर्शनासाठी गेले असता त्यांची पार्किंगमध्ये पार्क केलेल्या स्कुटीमधील कोणी अज्ञात चोरट्याने उत्तरपत्रिकांची चोरी केली होती. ही घटना २५ फेब्रुवारी रोजी घडली होती. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, नेरळ पोलिसांनी घटनेचे गांभिर्य लक्षात घेता या चोराच्या ४८ तासात मुसक्या आवळल्या आहेत. २९ वर्षीय रूपेश भानुदास साळुंखे असे आरोपीचे नाव असून तो तालुका खालापूर उंबरेवाडी येथील राहणारा आहे.




पनवेल येथील प्रसिद्ध पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मधील शिक्षक हे सुट्टीच्या दिवशी गुरुवारी (दि.२७) द्वितीय वर्षाच्या आयटी इंजिनिअरच्या या वर्गाच्या वैयक्तीक अर्थीक व्यवस्थापन या विषयाच्या १३६ संक्षीप्त उत्तरपत्रीका, हजेरीपट, प्रश्नपत्रीका, असे त्यांचे मित्र स्वप्नील वायंगनगर यांचे स्कूटी (एमएच ४६ बी.डब्ल्यु ३७४२) ममदापुर नेरळ या ठिकाणी घेवून येत असताना, सायकांळी ०७:२० वाजण्याचे सुमारांस चिंचवली येथील साईमंदीर येथे दर्शनासाठी त्यांची स्कुटी साईमंदीराचे बाहेरील पार्कीग मध्ये लावुन उत्तरपत्रीकांची बॅग स्कूटीचे हॅन्डला लावुन दर्शनासाठी गेले होते, परंतु दर्शन केल्यानंतर परत बाहेर आल्यानंतर सदर स्कुटीला लावलेली बॅग चोरीस गेली असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी नेरळ पोलीस ठाणे येथे हजर राहुन दिलेल्या तक्रारी वरून नेरळ गुन्हा रजि.नं. २३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०७ (इ), प्रमाणे दि.२७ फेब्रुवारी २०२७ रोजी रात्री ११:३६ वाजता गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन विद्यार्थ्याचे शैक्षणीक भवितव्याचा विचार करून सदर गुन्हयाचे तपासकामी व गुन्हा उघडकीस आणण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी डी. डी. टेळे, नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनीा तपासाबाबत सुचना व मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे सदर अधिकारी अंमलदार यांनी घटनास्थळावरील सी.सी.टी. व्ही. कॅमेरे, गोपनीय माहीतीचे आधारे, तांत्रीक तपासाच्या आधारे आरोपी रूपेश भानुदास साळुंखे (वय २९, रा. उंबरेवाडी ता. खालापुर) यांस मुद्देमालास ताब्यात घेण्यात आले आहे आरोपी याचेकडे अधिक तपास केला असता, त्याचेविरुद्ध खालापुर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत या मध्ये त्यास अटक करण्यात आली आहे.

## मालमत्ता करातील शास्ती लवकरच पूर्णपणे माफ करणार –उपमुख्यमंत्री शिंदे

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता करातील शास्ती लवकरच पूर्णपणे माफ करून दिलेला शब्द निश्चित पाळणार, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.



मावळचे खासदार श्रीरंग अप्पा बारणे यांच्या पाठपुराव्यामुळे ऑक्टोबर रोजी तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीरपणे घोषणा केली होती की लवकरच पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कराची शास्ती माफ करण्यात येईल, परंतु लगेच आचारसंहिता जाहीर झाल्यामुळे त्यावेळी निर्णयाची अंमलबजावणी करता आली नाही. याच विषयात पाठपुरावा करण्यासाठी गुरुवारी शिवसेनेचे पनवेल महानगर प्रमुख अॅड. प्रथमेश सोमण, महानगर संघटक मंगेश रानावडे, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, उपमहानगरप्रमुख महेश सावंत, सचिन मोरे, प्रसाद सोनवणे, इम्तियाज शेख तसेच महिला पदाधिकारी डॉ शिल्पा देशमुख, रीना पाटील, मंदा जंगले, यशोदा गायकवाड, यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुक्तागिरी निवास्थानी भेट घेऊन, पनवेल महानगरपालिका मालमत्ता करातील शास्तीबाबत सखोल चर्चा केली.

या वेळी एकनाथ शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क साधून लगेच याबाबत आवश्यक ते निर्णय घेण्यासाठी तातडीने कारवाई सुरू करण्याचे निर्देश दिले. राज्यातल्या इतरही काही महापालिकांबाबत असा निर्णय होण्याची शक्यता असून पनवेलचे ही नाव त्यामध्ये समाविष्ट करून अग्रक्रमाने हा विषय सोडवण्यात येईल, असे आश्वासन खुद्द शिंदे यांनी शिवसेनेच्या शिष्टमंडळाला दिले. या वेळी पनवेल शिवसेनेच्या वतीने याबाबतचे निवेदन पत्र मंगेश रानवडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना चर्चेत सादर केले.

## महावितरणच्या पथकाला मारहाण करणाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या

**कल्याण : प्रतिनिधी**

थकबाकीपोटी वीजपुरवठा खंडित केलेला असतानाही विजेचा चोरटा वापर करणाऱ्याविरुद्ध कारवाई करताना महावितरणच्या पथकाला मारहाण व शिवीगाळ करण्याची घटना भिवंडी तालुक्यातील कुंदे गावात शुक्रवारी घडली. याप्रकरणी चौघांविरुद्ध गणेशपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत.

दिनेश नामदेव होगे, नरेश आगिवले, तुकाराम आगिवले, शरद पाटील (राहणार कुंदे, ता. भिवंडी) अशी या प्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. वाडा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता अविनाश कटकवार यांच्या नेतृत्वाखाली आंबाडी शाखा कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता उद्देश बेलसरे, जनमित्र व सुरक्षा रक्षकांचे पथक शुक्रवारी सकाळपासून कुंदे गावात वसुली व वीजचोरी शोध मोहिम राबवत होते. यात दिनेश होगे याच्या घरात थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित करून मीटर काढलेले असतानाही विजेचा चोरटा वापर आढळून आला. कार्यवाहीचे सोपस्कार पूर्ण करून पथक इतरत्र जात असताना आरोपींनी पथकाला शिवीगाळ करत कामात अडथळा आणला. पथकातील जनमित्र महेश राजपुत यांच्या हातातील मोबाईल हिसकावून त्यांना मारहाण करण्यात आली. या घटनेबाबत उपकार्यकारी अभियंता कटकवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गणेशपुरी पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपींना बेड्या ठोकल्या.

या घटनेनंतर न डगमगता पथकाला बळ देत कटकवार यांनी शुक्रवारी राबवलेल्या मोहिमेत कुंदे गावात शुक्रवारी १३ वीज चोरट्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली. तर शनिवारी (१ मार्च) पुन्हा पोलीस संरक्षणात शोध मोहिम राबवत पथकाने आणखी पाच वीज चोरट्यांविरुद्ध कारवाई केली. मार्च अखेरच्या पार्श्वभूमिवर वीजबिल थकबाकीची वसुली अन्यथा थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करणे हे दोनच पर्याय वीज कर्मचाऱ्यांसमोर आहेत. प्राप्त परिस्थिती लक्षात घेऊन कर्तव्यावरील वीज कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## गाडी जाळणाऱ्या आरोपींचा शोध

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरात राहणाऱ्या एकाच कुटुंबातील दोन वेळा गाडी जाळणाऱ्या अज्ञात व्यक्तींचा शोध पनवेल शहर पोलीस करीत असून याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहनसुद्धा वपोनि नितीन ठाकरे यांनी केले आहे.

या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पनवेल शहर पोलिसांच्या हाती लागले असून त्यामध्ये अज्ञात व्यक्ती या ठिकाणी येवून त्यांच्या दोन्ही गाड्या वेगवेगळ्या वेळी जाळताना दिसत आहेत. तसेच त्यातील एकाने कुटुंबाच्या घराचे फोटो रात्रीच्या वेळी काढल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे हे कुटुंब अत्यंत भितीच्या छायेच्या जगत आहेत.

याबाबत पनवेल शहर पोलिसांनी या व्हिडीओच्या माध्यमातून आवाहन केले आहे की, अशा प्रकारच्या व्यक्ती तुम्हाला पनवेल, कळंबोली, तळोजा, शिळ डायघर, कल्याण किंवा इतर भागात आढळून आल्यास त्यांनी तत्काळ पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फॅकल्टी एक्सचेंज

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२८) अकाउंट व फायनान्स विभागातर्फे फॅकल्टी एक्स्चेज प्रोग्रॅमचे आयोजन केले होते.






या फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रामसाठी कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स व बिजनेस मॅनेजमेंट स्टडीज महाविद्यालयातील प्रा. हिना सतकूट यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स प्रथम वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीना फायनान्शियल अकाउंट विषयातील बारकावे, वेगवेगळ्या संकल्पना या विषयी मार्गदर्शन केले तसेच या व्याख्यानाचा लाभ सुमारे ३३ विद्यार्थी व विद्यार्थिनीनी घेतला. अकाउंट व फायनान्स विभागातील प्रा. आनंद शेलार यांनी कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स व बिजनेस मॅनेजमेंट स्टडीज महाविद्यालयात उपस्थित राहून तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना इन डायरेक्ट टॅक्स व कॉस्ट अकाउंटिंग याविषयी मार्गदर्शन केले व त्यांच्या शंकांचे निरसन केले तसेच त्यांच्या व्याख्यानाचा लाभ सुमारे ४२ विद्यार्थी व विद्यार्थिनीनी घेतला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला. या फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅमचे आयोजन प्रा. प्रवर शर्मा विभाग प्रमुख अकाउंट्स व फायनान्स विभाग यांनी केले तसेच प्रा. नंदिनी सकपाळ, प्रा. योगिता व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## मराठी कवितेचा जागर



**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मुंबई मराठी पत्रकार संघ आणि जागतिक मराठी अकादमी आयोजित सोहळ्यात मराठी कवितेचा जागर करण्यात आला. ज्येष्ठ कवी रामदास फुटाणे, अशोक नायगावकर, महेश केळूसकर यांच्यासह अनेक युवा कवींनी, पत्रकारांनी आपल्या कविता या वेळी सादर केल्या.

या कविसंमेलनात रामदास फुटाणे यांच्यासहीत अशोक नायगावकर, महेश केळुसकर, शशिकांत तिरोडकर, संकेत म्हात्रे, प्रथमेश पाठक, जितेंद्र लाड, मंगेश विश्वासराव, भगवान निळे, सदानंद खोपकर, अजय वैद्य आणि प्रसाद मोकाशी यांनी आपल्या कविता सादर केल्या. या भाषा दिनाचे औचित्य साधून मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सदस्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन तसेच कविश्रेष्ठ वि. वा. शिरवाडकर यांच्यावर वर्तमानपत्रात आलेले लेख, त्यांच्या मुलाखतींच्या कात्रणांच्या संग्रहाचे प्रदर्शन यावेळी करण्यात आले.

या दोन दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन रामदास फुटाणे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक राजेंद्र हुंजे यांनी तर सोहळ्याचे आभार आत्माराम नाटेकर यांनी मानले.

## सीकेटी महाविद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार भारतीय संविधानाच्या ७५ व्या वर्षपूर्तिनिमित्त संविधान गौरव महोत्सव अंतर्गत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता आणि हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय राज्यघटनेवर प्रश्नमंजुषा स्पर्धा गुरुवारी (दि.२७) महाविद्यालयाच्या कौशल्य तथा संसाधन विकास केंद्र याठिकाणी मोठ्या उत्साहात झाली.



या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांनी भरभरुन सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी विधार्थ्यांचे विविध संघ तयार करण्यात आले होते व प्रत्येक संघामधे प्रत्येकी चार अशी विद्यार्थी संख्या होती, स्पर्धेमधे एकूण नऊ संघानी उल्हासाने सहभाग नोंदवला होता म्हणजेच एकूण ३६ विद्यार्थ्यांचा समावेश होता. प्रस्तुत प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये भारतीय संविधानातील मूल्ये, मूलभूत हक्क, कर्तव्ये व जबाबदाऱ्या, ऐतिहासिक पैलू, मुलभूत वैशिष्ट्ये, संविधानाची प्रस्तावना किंवा सरनामा तसेच राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे, भारतीय प्रशासन व राज्यव्यवस्था इत्यादींवर आधारित प्रश्नांचा अंतर्भाग करण्यात आला होता.


प्रस्तुत स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांनी भूषविले, त्यांचे स्पर्धेचे आयोजक तथा राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील यांनी यथोचित स्वागत करून स्पर्धेचा आढावा व अहवाल सादर करत विजेत्या संघाच्या नावाची घोषणा केली. ज्यामध्ये तृतीय वर्ष कला शाखेच्या रवी कांबळे, नितेश चौधरी, कासीम पटेल व हर्शल भगत यांच्या संघाने प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक द्वितीय वर्ष कला शाखेच्या स्वप्नील पाटील, समाधान साळवे, शेरॉन कुमठेकर, समृद्धी म्हात्रे यांच्या संघाने तर तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या प्रथम वर्ष कला शाखेच्या सानिका भोसले, प्रचिती लबडे, राजदीप कांबळे, विशाखा दिवेकर यांच्या संघाने पटकाविला. या सर्व विजेत्या संघांचा व संघातील सर्व सदस्य विद्यार्थ्यांचा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो.डॉ. बी. डी. आघाव यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करून त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी.डी. आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.आकाश पाटील व राज्यशास्त्र विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रायगडच्या सुपुत्राने बनारसला केले मंत्रमुग्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगडचे सुपुत्र पं. उमेश चौधरी यांनी वाराणसी 'सुबह–ए–बनारस' गायन समारंभात रसिकांना मंत्रमुग्ध केले. विशेष म्हणजे 'अस्सी घाट–काशी विश्वनाथ' येथे गायन करण्याचा सन्मान या रायगडच्या सुपुत्राला पुन्हा मिळाला. सूर, ताल आणि लय असा त्रिवेणी सांस्कृतिक संगम सोहळा या ठिकाणी पहायला मिळाला.



'सुबह–ए–बनारस' म्हणजे वाराणसीच्या (बनारस) सकाळच्या अद्वितीय सौंदर्याचे वर्णन करणारा शब्द आहे. गंगा नदीच्या किनाऱ्यावरील सूर्योदयाच्या वेळी घाटांवर होणारी गंगा आरती, योग, संगीत, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश 'सुबह–ए–बनारस' मध्ये होतो. हे अनुभव स्थानिक रहिवासी आणि पर्यटकांसाठी आध्यात्मिक असतात. त्या अनुषंगाने 'सुबह– ए–बनारस' गायन समारंभात पं. उमेश चौधरी यांनी प्रारंभी शास्त्रीय गायन केले. मराठीचा बनारसमध्ये गौरव केला. त्यांना तबलावर पंकज राय आणि हार्मोनियमवर पं. पंकज मिश्र यांनी साथसंगत केली.

या वेळी बँक ऑफ इंडियाचे निवृत्त अधिकारी प्रभात अग्रवाल यांच्या हस्ते पं . उमेश चौधरी यांच्या सन्मानपत्र देऊन गौरव केला. या कार्यक्रमास बनारसमधील संजयक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन देवेंद्र मिश्र यांनी केले.

## आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील सिध्देश्वरी कॉर्नर येथील दिवा अँटिलिया येथे डॉ. प्रतिभा देवेंद्र महिंद्रकर यांच्या श्री साई क्लिनिक दवाखान्यात परिसरातील रूग्णांसाठी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.



या शिबिरात १२१ नागरिकांनी मोफत तपासणी करून तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घेतले. या वेळी आजार असणाऱ्या रुग्णांवर मोफत उपचार व मार्गदर्शन श्री साई क्लिनिकतर्फे करण्यात आले. या मोफत आरोग्य शिबिराचे उद्घाटन उद्योजक विजय मुरकुटे व रसायनी पोलीस ठाण्याचे सपोनि माळी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची या आरोग्य शिबिरास उपस्थिती लाभली होती. त्यांचे स्वागत डॉ. देवेंद्र व डॉ. प्रतिभा महिंद्रकर यांनी केले.

## अलिबागमध्ये स्वच्छ जल अभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

संत निरंकारी मंडळातर्फे अलिबाग तालुक्यात चार ठिकाणी स्वच्छ जल अभियान राबविण्यात आले. या अभियानात निरंकारी भक्तांबरोबरच स्थानिक ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ सहभागी झाले होते.



संत निरंकारी मंडळातर्फे संपूर्ण देशात अमृत प्रोजेक्ट २०२५ अंतर्गत स्वच्छ जल, स्वच्छ मन अभियानाच्या तिसरा टप्पा राबविण्यात येत आहे. निरंकारी मंडळ अलिबाग ब्रँचतर्फे वरसोली समुद्र किनारा, सारळ ब्रँचतर्फे सारळ समुद्र किनारा, भिलजी ब्रँचने रेवदंडा, पारनाका समुद्र किनारा, तर पोयनाड ब्रँचने बांधण येथील नदी किनारा येथे स्वच्छ जल अभियान राबविले.

संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमान हरदेवसिंह यांच्या शिकवणुकीतून प्रेरणा घेत या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. २७ राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील एक हजार ६५०पेक्षा अधिक ठिकाणी १० लाखांहून अधिक संख्येने स्वयंसेवक भक्तगणांनी सेवाभावनेने एकाच वेळी हे अभियान साकारले, अशी माहिती संत निरंकारी मंडळाचे सचिव व समाजकल्याण प्रभारी जोगिंदर सुखीजा यांनी दिली.


## दुखवटा

### पुंडलिक पाटील



**कर्जत :** तालुक्यातील कशेळे येथील ज्येष्ठ ग्रामस्थ पुंडलिक वाळकु मते पाटील (वय ८२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,दोन कन्या, सून, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. पुंडलिक पाटील हे माजी आमदारा सुरेश लाड यांचे ते मेव्हणे होते, तर कर्जत पंचायत समितीच्या माजी सदस्य उर्मिला तथा नानी पुंडलिक पाटील यांचे पती होते.

### सीताराम पोवार



**माणगाव :** नगरपंचायत हद्दीतील खांदाड गावचे ज्येष्ठ ग्रामस्थ तथा स्टेट बँक ऑफ इंडिया माणगाव शाखेचे सेवानिवृत्त कर्मचारी कै.सीताराम दगडू पोवार (वय ६४) यांचे शुक्रवारी (दि.२८) निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी, तीन मुली, एक मुलगा,दोन जावई, नातवंडे असा परिवार आहे. कै. सीताराम पोवार यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि.९ मार्च) तर उत्तरकार्य विधी मंगळवारी (दि.११ मार्च) मोर्बारोड, खांदाड–माणगाव येथे होणार आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून घरकुलांची पाहणी

**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्हाधिकारी तथा तथा जिल्हा दंडाधिकारी किशन जावळे यांनी बुधवारी (दि.२६) पनवेल येथील पोयंजे ग्रामपंचायत येथील कातकरी आदिवासीवाडी येथे प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान पीएम जनमन अंतर्गत झालेल्या घरकुलांची पाहणी केली.



यामध्ये प्रामुख्याने जिल्हाधिकारी यांनी कातकरी वाडीतील सर्व सुविधांची बारकाईने पाहणी केली. यामध्ये घरकुलांचे आतील चटई क्षेत्र; त्याचप्रमाणे दारे खिडक्या, यामध्ये शौचालयाला जोडलेला शोषखड्डा त्याचप्रमाणे वाडीला मिळणारे रोजचे पाणी याचा स्तोत्र तसेच वापराव्यात आणावयाच्या पाण्याचा स्त्रोत्र याचीसुद्धा बारकाईने पाहणी केली. त्याचप्रमाणे वाडीतील सर्व लहान मुले आबालवृद्ध व महिलावर्ग यांच्याशी रोजगाराविषयी चर्चा केली. यामध्ये कायमस्वरूपी रोजगार कसा निर्माण होईल याचीही चर्चा केली.

या दौऱ्यामध्ये तेजस्वी गलांडे प्रकल्प संचालक पेण आदिवासी विभाग, माजी सरपंच जगदीश मते, ग्रामपंचायत अधिकारी धनंजय निकम उपस्थित होते. दौऱ्यामध्ये जावळे यांनी बर्याच बारीक-सारीक गोष्टींची नोंद घ्यावयास लावली.

तसेच पोयंजे कातकरी वाडी ही पीएम जनमन मधील आदर्शवाडी करावी, अशा सूचना दिल्या.

# वाहतूक पोलीस व पत्रकारांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड प्रेस क्लब अंतर्गत पनवेल तालुका प्रेस क्लबच्या वतीने आज लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आणि पनवेल तालुका प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक पोलीस त्याचबरोबर पत्रकार यांच्यासाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर मोठ्या उत्साहात झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, सुप्रसिद्ध नेत्रचिकिस्तक तथा मेडी. डायरेक्टर लक्ष्मी इन्स्टिट्यूटचे डॉ.सुहास हळदीपुरकर यांच्या उपस्थितीत झाले.

वाहतूक पोलीस हे वर्षाचे बारा महिने अहोरात्र रस्त्यावर सेवा बजावत असतात. त्यांना स्वतःच्या प्रकृती कडे लक्ष देयला सुद्धा वेळ नसतो. तीच व्यथा ही समाजाचा चौथा आधारस्तंभ म्हणजे पत्रकार. त्यांनासुद्धा समाजात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडी या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवायच्या असतात. त्यांचेसुद्धा स्वतः याकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. याचेच औचित्त साधून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल तालुका प्रेस क्लब चा हा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे, अशी प्रशंसा आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. उन्हातानात काम करणारा वाहतूक पोलीस कर्मचारी हा नेहमीच दुर्लक्षित असतो आणि त्याची काळजी पत्रकारांनी घेत अशा पद्धतीने उपक्रम राबवला त्याबद्दल पनवेल महापालिकेच्या आयुक्त मंगेश चितळे यांनी आपली प्रतिक्रिया दिली.

वाहतूक पोलीस हे ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता रस्त्यावरती काम राहतो आणि त्याची दखल प्रत्येक जण घेतो असं नाही पण ही दखल पनवेल प्रेस क्लबने घेतली त्याबद्दल वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी आपले मत व्यक्त केले. त्याचबरोबर नेत्र तपासणी शिबिराचा आयोजन केल्याबद्दल पोलीस आयुक्तांच्या तर्फे पनवेल शहराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी पनवेल तालुका प्रेस क्लबचे आभार मानून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सातत्याने असेच विविध कार्यक्रम प्रेस क्लबच्या माध्यमातून राबवण्याचा निर्धार या वेळी पनवेल तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांनी वेळी व्यक्त केला.

या वेळी वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील, पनवेल शहराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक नितीन पाटील, मराठी पत्रकार परिषद अध्यक्ष मिलिंद अष्टीकर, विभागीय सचिव, मराठी परिषद कोकण विभाग मनोज खांबे, अध्यक्ष रायगड प्रेस क्लब प्रशांत गोपाळे, रायगड प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष विजय पवार, अनिल भोळे, भारत रांजणकर, पनवेल तालुका प्रेस क्लबच्या उपाध्यक्ष तृप्ती पालकर, सरचिटणीस स्वप्नील दुधारे, कार्याध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार दत्तात्रय कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, संजय कदम तसेच नितीन कोळी, राकेश पितळे, सनी पांडे आणि सचिन भोळे आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर विद्यालयात अमली पदार्थविरोधी विभागाची कार्यशाळा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (दि.१ मार्च) या दिवशी अमली पदार्थविरोधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय आणि ईनर व्हिल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत प्रमुख अधिकारी आणि तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना अंमली पदार्थाचे दुष्परिणाम, त्याचा समाजावर होणारा परिणाम आणि कायदेशीर तरतुदी विषयी माहिती दिली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना अंमली पदार्थाच्या व्यसनापासून दूर राहण्याचे आणि समाजात याबाबत जनजागृती करण्याचे आवाहन केले.

या कार्यशाळेस प्रमुख पाहुणे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर तसेच इनरव्हिल क्लबचे मुख्य कार्यकारी सदस्या वर्षा ठाकूर या होत्या. या कार्यशाळेस प्रमुख वक्ता म्हणून अंमली पदार्थ विरोधी विभाग प्रमुख पोलीस निराक्षक संदीप निगडे, गुन्हे शाखेचे सहाय्यक उपनिरीक्षक सुदर्शन सारंगे हे होते.

याचबरोबर सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरज गोरे, इनरव्हिल क्लबच्या अध्यक्ष डॉ. विणा मनोहर, सचिव अंजली कुलकर्णी, माजी अध्यक्ष अ‍ॅड. सुजाता चव्हाण, सदस्य मेघा तांडेल, पुर्णिमा हळदीपूरकर, इनरव्हिल क्लबचे संपादक उर्वी पोतदार, प्राचार्य निशा नायर, रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्सच्या प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे आदी उपस्थित होते.

# सीकेटी विद्यालयात जीवनशैलीवर मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने शुक्रवारी (दि.२८) नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयात अभियंता प्रकाश चव्हाण (डॉ. दिक्षित जीवनशैली, समुपदेशक व समन्वयक, नवीन मुंबई) यांचे डॉ. दिक्षित यांनी विकसित केलेल्या जीवनशैलीवर आधारित व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या वेळी सीकेटी इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका निरजा मॅडम, सर्व विज्ञान शिक्षक व इतर शिक्षक उपस्थित होते. या वेळी प्रकाश चव्हाण यांनी सांगितले की, मानवी शरीर दीर्घकाळ कसे टिकवता/सांभळता येईल तसेच शरीरातील अतिरिक्त मेद कमी करण्यासाठी काय करावे लागेल. कोणत्या गोष्टींचे पालन करावे लागतील. कोणत्या गोष्टींना निर्बंध घालावे लागतील या विषय अतिशय उपयुक्त, असे मार्गदर्शन केले.

प्रत्येकाने स्वत: सुदृढ निरोगी राहण्यासाठी डॉ. दिक्षित जीवनशैलीचे पालन करावे असे आवाहन त्यांनी या वेळी विद्यार्थ्यांशी बोलताना केले. पीपीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांसाठी काही प्रश्नमंजुषेचेही आयोजन केले होते. ज्या विद्यार्थ्यांनी योग्य उत्तरे दिली. त्या विद्यार्थ्यांचे त्यांनी बक्षिस देऊन कौतुक केले.





**खारघर : येथील सेक्टर १७मध्ये नव्याने आयसीआयसीआय बँकेची शाखा सुरू झाली आहे. या शाखेचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. दरम्यान, आयसीआयसीआय बँकेच्या या शाखेला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक निलेश बावीस्कर, सरचिटणीस दीपक शिंदे, समीर कदम, शैलेंद्र त्रिपाठी, रामचंद्र पाटील, अरुण नाईक, संतोष शर्मा, दीपक ठाकूर आदी उपस्थित होते.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विज्ञान मासिकाचे प्रकाशन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विज्ञान संघटनेतर्फे शुक्रवारी विज्ञान मासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

या प्रकाशन सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. इशा ठाकरे (माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख सी के टी महाविद्यालय न्यू पनवेल) उपस्थित होत्या तसेच त्यांच्या हस्ते विज्ञान मासिकाचे प्रकाशन केले. या मासिकासाठी महाविद्यालयातील विज्ञान तसेच माहिती व तंत्रज्ञान संगणक विभागातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आर्टिफिशल इंटेलिजन्स, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र तसेच इतर वेगवेगळ्या विषयावरती लेख लिहून दिले होते ते सर्व ३० लेख या मासिकात प्रसिद्ध झाले.

या मासिकाचे मुख्य उद्दिष्टे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व जनमानसात रुजविणे आणि त्या माध्यमातून समाजातील वैज्ञानिक चेतना वाढवणे हे होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे याही या वेळी उपस्थित होत्या व त्यांच्या हस्ते मासिकाचे प्रकाशन केले तसेच विज्ञान संघटनेतील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या विज्ञान मासिक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन प्रा. राजश्री म्हात्रे यांनी केले तसेच विज्ञान विभागातील तसेच संगणक व माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.





**कळंबोली : सेक्टर २मध्ये सिडकोने ४० ते ४५ वर्षांपूर्वी आठ इमारती उभारल्या होत्या. या सर्व इमारतींची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून स्लॅब पडण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने रहिवाशांना राहण्यासाठी या इमारती धोकादायक बनल्या आहेत. अशातच शुक्रवारी सिडकोने विकसित केलेल्या साईबाबा अपार्टमेंटमधील एका घराचा स्लॉब कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणत्याही प्रकारची जीवितहानी नाही झाली. दरम्यान, वारंवार घडत असलेल्या या घटनांमुळे रहिवासी भयभीत झाले असून ते या इमारतींचे पुनर्विकास करावा, अशी मागणी शासनाकडे करीत आहेत.**

# सिडको एम्प्लॉइज युनियनच्या निवडणुकीत प्रगती पॅनल विजयी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडको एम्प्लॉइज युनियनच्या निवडणुकीत पुन्हा एकदा प्रगती पॅनल विजयी झाले. प्रगती पॅनल मागील २० वर्षांपासून सत्तेवर आहे. अध्यक्ष पदावर नरेंद्र हिरे, सरचिटणीसपदी नितीन कांबळे,उपाध्यक्ष पदी संजय पाटील, प्रमोद पाटील, चिटणीसपदी यतिष पाटील, खजिनदारपदी सुभाष पाटील, सहचिटणीसपदी सुधीर कोळी, रवींद्र डोंगरे, सुबोध भोईर व १५ सदस्यांची निवड झाली.

सिडको महामंडळातील आव्हाने पाहता एक सक्षम युनियन निवडून देणे खूप गरजेचे होते. समता पॅनलचा धुव्वा उडवून सिडको कर्मचारी यांनी पुन्हा एकदा प्रगती पॅनलवर विश्वास ठेवला.



# पनवेल न्यायालयाच्या नवीन इमारतीमध्ये मराठी भाषा गौरव दिन

**उरण : बातमीदार**

अधिवक्ता परिषद पनवेल यांचेतर्फे मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ साहित्यिक एल.बी. पाटील उरण यांच्या व्याख्यानाचे आयोजन बार रूम पनवेल येथे केले होते.

या वेळी व्यासपीठावर अधिवक्ता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष अ‍ॅड. मनोज भुजबळ, महामंत्री सुनील तेलगे, तालुका महामंत्री अस्मिता भुवड, नवी मुंबई युनिटचे अध्यक्ष विशाल जाजु, सरकारी वकील थळकर मॅडम आदी उपस्थित होते.

अधिवक्ता नूतन केणी यांनी सूत्रसंचालन केले. अधिवक्ता नागेश हिरवे यांनी खणखणीत आवाजात प्रस्तावना व वक्ता परिचय करून दिला.



तर अस्मिता भुवड यांनी आभार मानले.

उरणचे सुपुत्र तथा जेष्ठ साहित्यिक व महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळचे सदस्य प्राध्यापक एल.बी. पाटील यांनी त्यांच्या मुख्य भाषणामध्ये मराठीतील बोली भाषांचे महत्त्व, छत्रपती शिवाजी महाराज यांचा उज्ज्वल इतिहास व आगरी बोलीतील कविता, समाजाचे प्रश्नांबद्दल प्रबोधन अशा विविध मुद्द्यांना स्पर्श करीत मराठी भाषेचे महत्त्व जोरकसपणे पटवून दिले. त्यांचेनंतर अधिवक्ता मनोज भुजबळ व थळकर मॅडम यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला वकिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाला नवी मुंबईहून जाजु सर व त्यांचे सहकारी आणि अलिबाग महामंत्री निकेत चवरकर यांची उपस्थिती होती.

माजी न्यायाधीश हवेलीकर हेही उपस्थित होते. जिल्हा महामंत्री सुनील तेलगे व जिल्हा कार्यालयीन मंत्री मनोज म्हात्रे यांच्या प्रेरणेतून कार्यक्रम झाला.

# अनिल दाभाडे यांच्या चारोळ्यांना दाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने कोकण मराठी साहित्य परिषद शाखा पनवेल आणि के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय पनवेल यांच्यावतीने खुले कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या खुल्या कविसंमेलनाच्या अध्यक्ष अ‍ॅड.मंदाकिनी पाटील या होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध गझलकार ए.के.शेख होते. यासह के.गो.लिमये वाचनालयाच्या अध्यक्ष सुनिता जोशी व गझलकार रोहिदास पोटे व्यासपीठावर होते.

या खुल्या कविसंमेलनात रसायनी येथील सुपरिचित साहित्यिक, कवी, लेखक, चारोळीकार, अनिल दाभाडे यांनी एकूण सहा चारोळ्या सादर केल्या. त्यामध्ये अंतरीच्या भावना, शब्दांची असते एक भाषा, शब्द असावे फुलांसारखे, सहजच डोकावून पाहिले, राहून राहून येते आठवण आणि प्रदूषणाने घातला विळखा या चारोळ्या अनिल दाभाडे यांनी आपल्या मधूर आवाजात रसिकांपुढे सादर केल्या.



**पनवेल : महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी लाईन आळी येथील नागरिकांसाठी रेशनकार्ड केवायसी करण्याचे शिबिर राबविले. त्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला.**

# ‘दास्तान’ला दिलीपकुमारचे चाहते विसरू इच्छितात

**ही गोष्ट दिलीपकुमार ॲन्ग्री ओल्ड मॅन बनण्यापूर्वीची... दिलीपकुमार सूडनायक कधीपासून झाला? सुभाष घई दिग्दर्शित ‘विधाता’पासून. त्याने तसे करणे बदलत्या काळानुसार गरजेचे होते. रमेश तलवार दिग्दर्शित ’दुनिया’, यश चोप्रा दिग्दर्शित ‘मशाल’ यातही दिलीपकुमारने सूडाची भूमिका साकारलीय. सुभाष घई दिग्दर्शित ‘विधाता’, ’कर्मा’ आणि ‘सौदागर’ अशा तीन चित्रपटात दिलीपकुमार होता ही वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट. एक प्रकारचा विक्रमच.**

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

दिलीपकुमारची कार्यशैली आत्मसात करून सुभाष घईंनी हे यश प्राप्त केले असे कौतुकाने म्हणायला हवे. साठ व सत्तरच्या दशकातील यशस्वी निर्माता व दिग्दर्शक नासिर हुसेन यांनी जबरदस्त या चित्रपटाचे मुहूर्त दिलीपकुमारवरच केला. आशा पारेखने त्यासाठी मुहूर्त क्लॅप दिला. काही कारणास्तव हा चित्रपट मुहूर्ताकडे जात नव्हता. दिलीपकुमारऐवजी संजीवकुमारला घेऊन जबरदस्त पडद्यावर आणला आणि फर्स्ट शोपासूनच सुपर फ्लॉप.

त्या काळातील दिलीपकुमारचा अतिशय महत्त्वाचा चित्रपट म्हणजे मुशीर रियाज निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित शक्ती. त्यात दिलीपकुमार व अमिताभ बच्चन यांच्यात अभिनयाचा जबरदस्त सामना रंगला. काही दृश्यात अमिताभ भारी ठरलाय हे सत्य त्या काळातील दिलीपकुमारप्रेमीना मान्य झाले नाही. वस्तुस्थिती तीच आहे. हे सगळेच घडण्यापूर्वीच एक महत्वाची गोष्ट घडली.

बी.आर. चोप्रा निर्मित आणि दिग्दर्शित बी.आर. फिल्मचा दास्तान (रिलीज ३ मार्च १९७२) पडद्यावर येताच रसिकांनी पूर्णपणे नाकारला. या चित्रपटाच्या प्रदर्शनास यशस्वी त्रेपन्न वर्षे पूर्ण झाली तरी तो विविध कारणास्तव फोकसमध्ये आहे. (हेदेखील एक प्रकारचे यशच म्हणायचे) याच दिवशी प्रदर्शित झालेल्या मेहमूद व एन.सी. सिप्पी निर्मित व एस. रामनाथन दिग्दर्शित ’बॉम्बे



टू गोवा’ची एन्टरटेन्मेन्ट एन्टरटेन्मेन्ट एन्टरटेन्मेन्टची गाडी मात्र आजही सुरू आहे. एकाच शुक्रवारी हे दोन चित्रपट प्रदर्शित होताना पहिल्या दिवसापुरते ‘दास्तान ’चे पारडे जड होते. रसिकांनी ’बॉम्बे टू गोवा’च्या बाजूने कौल दिला. मी कायमच म्हणतो, कोणता चित्रपट डोक्यात नि डोक्यावर घ्यायचा याचा निर्णय प्रेक्षकांनाच घेऊ देत. त्यांची आवडीनिवडीची भूमिका खूपच महत्त्वाची. त्यांना ‘निमल’, ‘पुष्पा २’, ‘छावा’ आवडले आणि हाऊसफुल्ल गर्दीत ते धो धो चालू लागले ही यशाची गोष्ट वर्षानुवर्ष सुरू आहे.

(आजच्या कार्पोरेट युगाला उगाच वाटतं, मोठ मोठ्या जाहिराती, मुलाखती आणि उत्पन्नाचे फुगवलेले आकडे दिल्याने पिक्चर हिटचा समज होतो. पब्लिकला गृहीत धरू नका. यह पब्लिक है, सब जानती है.

दिलीपकुमारची दुहेरी भूमिका असलेला ‘दास्तान’ तर रसिकांनी पूर्णपणे नाकारला. जराही उशीर न करता नाकारला. चाणक्य दिग्दर्शित राम और ‘श्याम’ (१९६७)मधील दिलीपकुमारचा डबल रोल लोकप्रिय ठरल्यानंतरचा हा चित्रपट. ‘राम और श्याम’ आजही जवळपास साठ वर्षांनंतर फुल्ल करमणूक करतो. कितीही वेळा पहावा. एन्जॉय करावा. धमाल अनुभव. दास्तानचे मुंबईत मेन थिएटर नॉव्हेल्टी होते आणि फस्ट डे फर्स्ट शोपासूनच रसिकांनी आपली निराशा व्यक्त केली. त्यांना चित्रपटात काहीच दम दिसेना. बी.आर. चोप्रा यांजकडून हे अजिबात अपेक्षित नव्हतेच. प्रेक्षकांची नाडी ओळखलेला आणि विविधता दिलेला दिग्दर्शक ही त्यांची ओळख.

बी.आर. चोप्रा यांनी आपल्याच अफसाना (१९५१) या सुपर हिट चित्रपटाची रिमेक म्हणून दास्तानची अतिशय जोरदार पूर्वप्रसिद्धीने निर्मिती केली. मूळ चित्रपटात अशोककुमार डबल रोलमध्ये होते. घोषणेपासूनच दास्तान चर्चेत राहिला. बी.आर. चोप्रा दिग्दर्शित ‘नया दौर’ (१९५७)मध्ये दिलीप कुमारने भूमिका साकारली होती आणि चित्रपट यशस्वी ठरला होता. उत्तम सामाजिक आशय असलेला असाच हा चित्रपट.

‘दास्तान’ची नायिका म्हणून शर्मिला टागोरची निवड झाली म्हणून अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. शर्मिला टागोर खास करून शशी कपूर (वक्त, आमने सामने वगैरे), धर्मेंद्र (यकिन, मेरे हमदम मेरे दोस्त, देवर इत्यादी), राजेश खन्ना (आराधना, अमर प्रेम वगैरे) यांची नायिका म्हणून ओळखली जाणारी, पण त्या काळातील अनेक अभिनेत्रींप्रमाणेच शर्मिला टागोरला दिलीपकुमारची नायिका बनण्याची महत्त्वाकांक्षा असणारच. ‘दास्तान’मुळे ती पूर्ण झाली. (आत्माराम दिग्दर्शित ’यह गुलिस्ता हमारा’मुळे देव आनंदची नायिका बनण्याचे तिचे स्वप्न पूर्ण तर झाले, तोही पिक्चर फ्लॉप. अरेरे. शर्मिला टागोरची ही स्वप्ने रसिकांनी पूर्ण होऊ दिली नाहीत.ती राज कपूरची नायिका बनू शकली नाही इतकेच)

यासह बिंदू, आय.एस. जोहर, मदनपुरी, सचिन पिळगावकर (यांनी बालपणीच्या दिलीप कुमारची दुहेरी भूमिका साकारली), मनमोहन कृष्ण, गोपीकृष्ण, पद्मा खन्ना आणि प्रेम चोप्रा यांच्या प्रमुख भूमिका. छायाचित्रण धरम चोप्रा यांचे, तर संकलन प्राण मेहरा यांचे. साहिर यांच्या गीतांना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत असा अगदी वेगळा योग. सगळे कसं छान जुळून आले. या चित्रपटाचे संगीत कल्याणजी आनंदजी यांना हवे होते, त्यांचे तसे प्रयत्नही होते, कारण तोपर्यंत त्यांनी बी.आर. चोप्रा यांच्या चित्रपटांचा संगीत दिले नव्हते, तर लक्ष्मीकांत प्यारेलालही या चित्रपटासाठी प्रयत्नशील होते, कारण दिलीपकुमारच्या



चित्रपटाला संगीत देण्याचा हा पहिला योग आला होता. चोप्रासाहेबांनी त्यांचीच निवड केली. गाणी आजही लोकप्रिय आहेत हे विशेष. पिक्चर फ्लॉप नि गाडी हिट असा हा फंडा. अनेक चित्रपटांबाबत घडलेला. चित्रपट इतिहासातील हाही एक रंग.

चित्रपट पूर्ण होताच याच्या गाण्याच्या तबकडी विक्रीला आल्या. त्यातील ना तू जमी के लिए (पार्श्वगायक मोहम्मद रफी) हे दर्दभरे गाणे ’ऐकता ऐकता’ लोकप्रिय झाले. दिलीप कुमार आणि मोहम्मद रफी हे अगदी हिट आणि फिट समीकरण. याशिवाय मारिया ओ स्वीट हार्ट (महेन्द्र कपूर आणि आशा भोसले), ओ हाय मै की करा, वो कोई आया (आशा भोसले) इत्यादी गाण्यांचा चित्रपटात समावेश. बी.आर. चोप्रांच्या चित्रपटातील गाणी हा कायमच विशेष उल्लेखनीय गोष्ट.

एखादा दिग्दर्शक आपल्याच सुपर हिट चित्रपटाची रिमेक करतो तेव्हा त्याचा आत्मविश्वास वाढलेला असतो. ’अफसाना ’चे लेखन आय.एस. जोहरचे आहे (तोच तो अभिनेता जोहर) आणि त्यात अशोककुमार (दुहेरी भूमिका), वीणा, प्राण, कुलदीप कौर, जीवन इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. असद भोपाली यांच्या गीतांना हुस्नलाल भगतराम यांचे संगीत आहे. या चित्रपटातील अभी तो मै जवान हूं (लता मंगेशकर), किस्मत बिगडी दुनिया बदली (मुकेश) ही गाणी लोकप्रिय झाली.

हा ’अफसाना’ तमिळ चित्रपट ’वेंडट्टा’ या चित्रपटावर बेतला होता. एखाद्या चित्रपटाची पाळेमुळे अशी रुजलेली असतात. एक सुपरहिट चित्रपट कुठून कसा भाषा बदलत, रूपडं बदलत प्रवास करतो याच्या अनेक उदाहरणातील हाही एक चित्रपट.

या चित्रपटाची थीम काय? एक असतो, सरळमार्गी, सत्प्रवृत्त न्यायाधीश अनिलकुमार दीवाण, तर दुसरा असतो रंगभूमीवर काम करणारा अभिनेता सुनील (दोन्ही भूमिकेत दिलीपकुमार). हा कलाकार श्रीमंत घरातला, पण अभिनयाचे त्याला विशेष आकर्षण आहे. एकदा एका हॉटेलमध्ये या दोघांची भेट होते तेव्हा एक नाट्य घडते. अभिनेता ठरवतो की यापुढे आपण या न्यायाधिशासारखी दाढी लावून वावरायचे. त्यानुसार तो न्यायाधीश झोपला असताना त्याची दाढी सफाचट करतो आणि स्वतः खोटी दाढी लावतो. दुर्दैवाने या खोटी दाढी लावलेल्या अभिनेत्याचा अपघातात मृत्यू होतो आणि वृत्तपत्रात पहिल्या पानावर बातमी प्रसिद्ध होते, न्यायाधीशाचे अपघातात निधन... आपल्याच निधनाचे वृत्त वाचून न्यायाधीश हादरतो. आता दाढी नसलेला न्यायाधीश आपल्या घरी येतो तेव्हा त्याला आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसतो. आपल्या निधनाचे वृत्त समजताच त्याची पत्नी माला (बिंदू) ही आपला प्रियकर राजनसोबत (प्रेम चोप्रा) अतिशय स्वच्छंदीपणे, मोकळेपणाने, दिलखुलासपणे मौजमजा करीत असते. वृत्तपत्रात आलेल्या न्यायाधीशाच्या निधनाचे वृत्त तिचा मोठा आधार असतो, ते सत्य आहे असा तिचा समज, पण घरातील इमानी कुत्रा मात्र आपल्या मालकाला अर्थात न्यायाधीशाला ओळखतो. क्लायमॅक्सला हा न्यायाधीश आपली बदफैली पत्नी आणि तिच्या प्रियकरावर सूड उगवतो. पुरेपूर नाट्य असलेली ही गोष्ट. पण कुठेतरी फसली. रसिकांना गुंतवून ठेवू शकली नाही.

चित्रपटात नायिका मीना (शर्मिला टागोर) हिच्या व्यक्तिरेखेला फारसं स्थान मिळाले नाही. दिलीपकुमार व ती फार अलिप्त वाटतात. तिने केवळ दिलीपकुमारसोबत संधी मिळाली म्हणून हा चित्रपट स्वीकारावा? मोह दुसरे काय? आणि त्यात आपलेच नुकसान.

चित्रपटाने अपेक्षित आकार घेतला नाही त्यामुळे त्याचा परिणामही फसला आणि अर्थातच रसिकांनी चित्रपट नाकारला. सर्व हक्क रसिकांच्या स्वाधीन. रसिकांच्या दृष्टिकोनातून चित्रपट इतिहास असा रोचक.

दिलीपकुमारने दुहेरी भूमिकेतील फरक उत्तम रितीने साकारणे आणि आपल्या उत्तम अभिनयाचा प्रत्यय देणे हे याही चित्रपटात पहायला मिळते. कमाल केली ती प्रेम चोप्रा आणि बिंदू यांनी. दोघांची केमिस्ट्री अगदी छान जमली. बिंदूने तर जनसामान्यांना राग यावा अशा पद्धतीने या भूमिकेत रंग भरला. अगदी खुनशी कटाक्ष असो अथवा जालीम मुद्राभिनय, बिंदूने कमाल केली आहे. बिंदूने अतिशय जालीमपणे साकारलेली व्यक्तीरेखेसाठी चोप्रासाहेबांनी अगोदर आशा पारेखच्या नावाचा विचार केला. दिलीपकुमारची नायिका होण्याचे तिचे दीर्घकालीन स्वप्न अशा पद्धतीने पूर्ण होत होते, पण एकिकडे आपण देव आनंद, शम्मी कपूर, शशी कपूर, मनोजकुमार, धर्मेंद्र, जितेंद्र, राजेश खन्ना यांची नायिका साकारत असताना केवळ दिलीपकुमारसोबत काम करायला मिळतेय म्हणून बदफैली स्त्री साकारायची? आशा पारेखला हे पटण्यासारखे नव्हतेच आणि




बिंदूसाठी परफेक्ट भूमिका होती. तिच्या कारकिर्दीतील ही एक सर्वोत्तम भूमिका ठरली. भूमिकेवर लिहिलेले असते ते करणार्याचे नाव. फक्त योग यायला हवा. तो आलाच आणि बिंदूला समिक्षकांनी दाद दिली. दास्तान हिट झाला असता तर बिंदूची अदाकारी अधिकाधिक अधोरेखित पोहचली असती.

त्रेपन्न वर्षांनंतरही ‘दास्तान’ची विशेष दखल घ्यावीशी वाटते हे तर त्याचे खूपच मोठे यश आहे आणि चित्रपटाच्या जगात यशासारखे महत्त्वाचे असे दुसरे काहीही नाही हो. ते हाऊसफुल्ल गर्दीतच असेल अथवा नसेल, पण त्याची अशी दखल घ्यावी लागते यातही असते अथवा असू शकते. विशेष उल्लेखनीय गोष्ट असित सेन दिग्दर्शित ‘बैराग’(१९७६)मध्ये दिलीपकुमारची तिहेरी भूमिका होती आणि तोही दणक्यात आपटला. त्याचाही आवाज आजही येतोय. फ्लॉप पिक्चरच्या अशा अपयशाच्या गोष्टी सांगायलाच हव्यात. त्यात काही वेगळेपण नक्कीच आहे.

दिलीपकुमारचे भक्त ‘दास्तान’पर्यंतच्या त्याच्या प्रवासावर जास्त फिदा आहेत. त्यांच्या दृष्टिकोनातून ‘बैराग’पासूनचा दिलीपकुमार त्याच्या प्रतिष्ठेला, लौकिकास साजेसा नाही आणि म्हणूनच ते पुन्हा पुन्हा मेहबूब खान दिग्दर्शित ‘अंदाज’, बिमल रॉय दिग्दर्शित ‘देवदास’ व ‘मधुमती’, के. असिफ दिग्दर्शित ’मुगल-ए-आझम’, बी.आर. चोप्रा दिग्दर्शित ‘नया दौर’, अमिया चक्रवर्ती दिग्दर्शित ‘दाग’ हे चित्रपट पुन्हा पुन्हा अनेकदा पाहत असतात. या चित्रपटांनी सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृह ते ओटीटी प्लॅटफॉर्म असा प्रवास केला तरी त्यावरची रसिकांची नजर कायम आहे. रसिकांच्या पुढील पिढीत हे चित्रपट सतत पुढे जात राहिले. दास्तान मात्र तिथेच थांबला...

# स्वातंत्र्यसेनानी सरोजिनी नायडू

भारतीय स्वातंत्र्यसेनानी व देशातील पहिल्या महिला राज्यपाल सरोजिनी नायडू यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म १३ फेब्रुवारी १८७९ रोजी हैदराबाद येथे झाला होता. त्या ‘भारत कोकिळा’ म्हणून प्रसिद्ध होत्या तसेच कवयित्री व उत्तम वक्त्याही होत्या.

सरोजनी नायडू यांच्या आईचे नाव वरद सुंदरी होते. ती एक कवयित्री होती आणि बंगालीमध्ये लिहायची. त्यांच्या वडिलांचे नाव अघोरनाथ चट्टोपाध्याय होते. ते प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ होते.

सरोजिनी यांनी वयाच्या अवघ्या १४व्या वर्षी सर्व इंग्रजी कवींच्या रचनांचा अभ्यास केला होता. १८९५मध्ये हैदराबादच्या निजामाने त्यांना शिष्यवृत्तीवर इंग्लंडला पाठवले. सरोजिनी नायडू या हुशार विद्यार्थिनी होत्या. त्यांना इंग्रजी, बंगाली, उर्दू, तेलुगू आणि पर्शियन भाषांचे चांगले ज्ञान होते. त्यांचा विवाह १८९८मध्ये डॉ. गोविंद राजालू नायडू यांच्याशी वयाच्या १९व्या वर्षी झाला होता. त्यांनी घरीच इंग्रजीचा अभ्यास केला आणि वयाच्या १२व्या वर्षी मॅट्रिक पास केले. त्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करता आले नाही, परंतु इंग्रजी भाषेत कविता रचण्यात त्या हुशार होती.

नायडू यांनी गीत कविता या प्रकारात कविता निर्माण केल्या आणि त्यांच्या कविता १९०५, १९१२ आणि १९१७मध्ये प्रकाशित झाल्या. १९०६च्या कोलकाता अधिवेशनात गोपाळ कृष्ण गोखले यांच्या भाषणाने नायडू राजकारणात सक्रिय होण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. भारतीय



समाजात पसरलेल्या दुष्कृत्यांसाठी त्यांनी भारतीय महिलांना जागृत केले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी विविध चळवळींमध्ये सहकार्य केले. जालियनवाला बाग हत्याकांडामुळे संतप्त होऊन त्यांनी १९०८मध्ये मिळालेला ‘कैसर-ए-हिंद’ सन्मान परत केला. हे पदक त्यांना भारतात प्लेगच्या साथीच्या काळात त्यांच्या कामासाठी देण्यात आले होते, पण जालियनवाला बाग हत्याकांडाचा राग आल्याने त्यांनी हा सन्मान परत केला.

भारत छोडो आंदोलनात आगा खान राजवाड्यात नायडू यांना शिक्षा झाली. त्या उत्तर प्रदेशच्या पहिल्या महिला राज्यपाल झाल्या. कुशल राजकारणी असण्यासोबतच त्या चांगल्या लेखिकाही होत्या. १९०३ ते १९१७ या काळात त्या टागोर, गांधी, नेहरू आणि इतर नायकांनाही भेटल्या. १९१४मध्ये त्या लंडनमध्ये महात्मा गांधींना पहिल्यांदा भेटल्या आणि गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाने त्यांना खूप प्रभावित केले. त्या दक्षिण आफ्रिकेत गांधीजींच्या सहयोगी होत्या.

गोपाळकृष्ण गोखले यांना त्या आपले ‘राजकीय पिता’ मानत. त्यांच्या विनोदी स्वभावामुळे त्यांना ‘जेस्टर इन गांधीजीज मिनी कोर्ट’ असे संबोधले जात असे. ॲनी बेझंट आणि अय्यर यांच्यासोबत त्यांनी १९१५ ते १८ या काळात तरुणांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठी भारताचा दौरा केला. १९१९च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्या गांधीजींच्या विश्वासू सहाय्यक होत्या.


१९१९मध्ये होमरूलच्या मुद्द्यावर त्या इंग्लंडला गेल्या. १९२२मध्ये त्यांनी खादी परिधान करण्याचे व्रत घेतले. १९२२ ते २६पर्यंत त्यांनी दक्षिण आफ्रिकेत भारतीयांच्या समर्थनार्थ आंदोलन केले आणि १९२८मध्ये गांधीजींचे प्रतिनिधी म्हणून त्या अमेरिकेला गेल्या.

सरोजिनी नायडू यांनी गांधीजींच्या अनेक सत्याग्रहांमध्ये भाग घेतला आणि ‘छोडो भारत’ आंदोलनात त्या तुरुंगातही गेल्या. वयाच्या अवघ्या १३व्या वर्षी त्यांनी १३०० ओळींची ‘द लेडी ऑफ लेक’ ही कविता लिहिली. पर्शियन भाषेत ‘मेहर मुनीर’ हे नाटक लिहिले. ‘द बर्ड ऑफ टाईम’, ‘द ब्रोकन विंग’, ‘निलांबुज’, ट्रॅव्हलर्स सॉन्ग ही त्यांची प्रकाशित पुस्तके. २ मार्च १९४९ रोजी वयाच्या ७०व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सरोजिनी नायडू यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी खूप संघर्ष केला. १३ फेब्रुवारी २०१४पासून म्हणजेच भारतातील नाइटिंगेल सरोजिनी नायडू यांच्या १३५व्या जयंती दिवसापासून ’राष्ट्रीय महिला दिन’ साजरा करण्यास सुरुवात झाली. **(साभार : इंटरनेट)**

# साहित्यिक राम शेवाळकर

सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक, उत्तम कीर्तनकार आणि प्रभावी वक्ते राम बाळकृष्ण शेवाळकर यांची आज जयंती. स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी, साने गुरूजी यांचे विचार त्यांनी श्रोत्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविले. त्याचबरोबर आपल्या काव्य व निबंधलेखनाने साहित्यिक म्हणूनही लौकिक प्राप्त केला.

राम शेवाळकर यांचे मूळ गाव परभणी जिल्ह्यातील शेवाळे व मूळ आडनाव धर्माधिकारी. त्यांचा जन्म २ मार्च १९३१ रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील अचलपूर येथे झाला. वडील विदर्भात ‘कीर्तनकेसरी’ म्हणून प्रसिद्ध होते. त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी वेदशास्त्रसंपन्नतेची. पणजोबा रामशास्त्री शेवाळकर हे वेदव्यासंगी पंडित; संचित (१९७५) हा त्यांच्या मराठी व संस्कृत पदयरचनांचा संग्रह. शेवाळकरांचे वडील बाळकृष्ण हे कीर्तनकार आणि कीर्तनासाठी आख्याने लिहिणारे. राम शेवाळकर हे आपल्या वडिलांच्या अनुकरणातून, लहान वयातच कीर्तने पाठ करून ती सादर करीत. त्यामुळे त्यांच्यात सभाधीटपणा आणि अमोघ वाणी आली. विदर्भातील अनेक उत्तम वक्त्यांचा उदा., डॉ. मुंजे, वीर वामनराव जोशी, बाबासाहेब खापर्डे, वि.घ. देशपांडे, पु.भा. भावे, बाळशास्त्री हरदास इत्यादींचा प्रभाव त्यांच्यावर पडला. त्यामुळे समाजप्रबोधनाचे एक अमोघ साधन म्हणून वक्तृत्वाचे सामर्थ्य त्यांना जाणवले आणि त्यांनी स्वतः च्या वक्तृत्वगुणांचा विकास केला. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही त्यांनी कित्येक व्याख्याने दिली आणि ‘वक्ता दशसहस्त्रेषु’ अशी ख्याती त्यांना मिळाली.



राम शेवाळकर यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अचलपूर येथेच झाले. शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर (१९४८) अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयातून ते बीए (१९५२) आणि नागपूर विद्यापीठातून एमए (संस्कृत १९५४; मराठी १९५६) झाले. वाशीम येथील शासकीय प्रशालेत ते आरंभी शिक्षक होते (१९५४-५५); त्यानंतर निरनिराळ्या महाविदयालयांतून प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर वणी येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयात प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले.

लहानपणापासूनच ते काव्यरचना करीत होते. असोशी (१९५६) हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. त्यानंतर रेघा (१९६७) आणि अंगारा (१९८९) हे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. निसर्गातील चैतन्याचा आणि सृजनशक्तीचा आविष्कार त्याच्या निरनिराळ्या रूपांतून पाहणे, त्यांना शब्दरूप देणे, हे त्यांच्या कवितेचे लक्षणीय वैशिष्ट्य होय. कवितेखेरीज त्यांनी अनेक निबंधही लिहिले. अग्निमित्र (१९७६), अमृतझरा (१९७६), देवाचे दिवे (१९८९), रूचिभेद (१९८९) आणि सारस्वताचे झाड (१९८९), तारकांचे गाणे (१९९४) हे त्यांचे काही ललित निबंधसंग्रह होत.

शेवाळकरांनी अनेक लोकनायक बापूजी अणे ह्यांच्या जन्मशताब्दीच्या वेळी त्यांनी लोकनायकांचे वाङ्मय स्वखर्चाने प्रकाशित केले, ही त्यांची एक विशेष उल्लेखनीय कामगिरी होय. त्यांनी संपादिलेल्या पुस्तकांत शिक्षणविचार (१९५५), यशोधन, त्रिविक्रम (३ खंड, १९९२) यांचा समावेश होतो. ‘शिक्षणविचार’मध्ये आचार्य विनोबाजी भावे ह्यांचे शिक्षणविषयक विचार आहेत. ‘यशोधन’मध्ये डॉ. य. खु. देशपांडे यांचे संशोधनपर लेखन अंतर्भूत आहे. वा. ना. देशपांडे ह्यांचे स्फुटलेख ‘त्रिविक्रम’मध्ये आहेत. पाणियावरी मकरी (२००८) हे त्यांचे आत्मचरित्र.

वाङ्मयीन-सांस्कृतिक-शैक्षणिक संस्थांतून विविध पदांवर कार्य केले. विदर्भ साहित्य संघाचे ते सतत नऊ वर्षे अध्यक्ष होते त्याचप्रमाणे महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा (उपाध्यक्ष) महाराष्ट्र साहित्य परिषद (उपाध्यक्ष) या संस्थांचे ते पदाधिकारी होते. साहित्य अकादमी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ अशा शासकीय मंडळांवरही त्यांनी सदस्य म्हणून काम केले आहे. १९९४मध्ये पणजीत (गोवा) झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

शेवाळकर यांना मिळालेल्या अनेक पुरस्कारांत ‘मॅन ऑफ द यिअर’ पुरस्कार (१९९७) साहित्य धुरंधर पुरस्कार, बॉस्टन, अमेरिका (१९९७); दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठानाचा कुसुमागज पुरस्कार (१९९९); मानद वाङ्मयपंडित (डी.लिट्.), नागपूर विद्यापीठ (२००१); नानासाहेब नारळकर, विद्वम् पुरस्कार (२००२) विदर्भ भूषण पुरस्कार, मुंबई (२००४) ज्ञानेश्वर पुरस्कार, पुणे (२००४) ‘नागभूषण’ पुरस्कार (२००७) आदींचा समावेश होतो. यांखेरीज विविध संस्थांकडून त्यांना मानपत्रे मिळाली आहेत. ३ मे २००९ रोजी त्यांचे निधन झाले.

**-अ.र. कुलकर्णी**
(मराठी विश्वकोष)

## निवडक

### अंजुमन महाविद्यालयात विज्ञान दिन



**मुरुड :** अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड जंजिरा येथे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय विज्ञान दिनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. अमानखान पठाण यांच्या 'राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व' या विषयी भाषणाने झाली. प्रा.शोयेबखान, प्रा.नितीन पवार, डॉ.स्वाती खराडे, प्रा. अल्ताफ फकीर, प्रा. जावेदखान मणियार, प्रा. बिस्मा किल्लेदार, प्रा. निदा गोरमे आणि ग्रंथपाल प्रा. अंजुम दाखवे आदी उपस्थित होते.

### मोरे कॉलेजच्या विद्यार्थिनींची क्षेत्रभेट



**रोहे :** एम.बी. मोरे फाउंडेशनचे कला, वाणिज्य, विज्ञान महिला महाविद्यालय धाटाव-रोहा येथील विद्यार्थिनींनी २८ फेब्रुवारी रोजी शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्स अंतर्गत इतिहास, भूगोल, वनस्पतीशास्त्र विषयनिहाय क्षेत्रभेटीत अलिबाग तालुक्यातील भू-चुंबकिय वेधशाळा, तीनवीरा येथील नेटिव्ह जैवविविधता उद्यान आणि रामेश्वर मंदीर या स्थळाचे प्रत्यक्ष अध्ययन केले. आंग्रेकालीन अष्टागारातील एक प्रमुख ठिकाण असलेल्या चौल येथील श्री रामेश्वर या पुरातन मंदिराचा इतिहास विद्यार्थिनींनी जाणून घेतला.

### 'नवयुग'मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन




**पोलादपूर :** नवयुग विद्यापीठ ट्रस्ट लाडवली येथील नवयुग इंग्लिश मीडियम स्कूल व मराठी माध्यमिक शाळेच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी व्यासपीठावर अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे तुकाराम शिंदे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रशिक्षण विभाग प्रमुख मनोहर तांडेल, अंधश्रद्धा निर्मूलन समिती जळगाव जिल्हा प्रधान सचिव प्रल्हाद बोराडे, नवयुगचे सचिव श्रीकांत सहस्त्रबुद्धे, नवयुग इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलच्या मुख्याध्यापिका अश्विनीराजे जाधवराव, नवयुग मराठी माध्यमिकचे मुख्याध्यापक मनोहर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# उल्हास नदीवर लोखंडी रेलिंग गरजेचे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवर बेंडसे आणि वावे या गावांना जोडणाऱ्या पुलावरून दरवर्षी पावसाळ्यात महापुराची पाणी जात असते. यावर्षी पावसाळ्यात त्या पुलावरून पावसाचे पाणी गेल्यानंतर पुलावरील लोखंडी रेलिंग वाहून गेले आहेत. त्या लोखंडी रेलिंग बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. बांधकाम विभाग बेडसे वावे पुलाला लोखंडी रेलिंगकधी बसविणार? असा प्रश्न स्थानिक उपस्थित करीत आहे.



उल्हासनदीवर वावळोली ग्रामपंचायतमधील बेंडसे आणि उमरोली ग्रामपंचायतमधील वावे या दोन गावांना जोडणारा पूल २०२० मध्ये बांधण्यात आला. त्यापूर्वी या भागातील लोकांना आपल्या गावी जाण्यासाठी एकतर कर्जत येथून किंवा भिवपुरी चिंचवली येथून जावे लागत होते, मात्र सार्वजनिक बांधकाम खात्याने वावे आणि बेंडसे या गवानां जोडणारा पूल बांधण्यात आला, परंतु त्या पुलाची उंची कमी असल्याने दरवर्षी पावसाळ्यात त्या पुलावरून महापुराची पाणी जाऊन स्थानिकांच्या घरात घुसून मोठे आर्थिक नुकसान सातत्याने होत आहे.

यावर्षी त्या पुलाला लावण्यात आलेले लोखंडी रेलिंग तुटून गेले असून ते लोखंडी रेलिंग पुन्हा लावण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग मागील तीन महिन्यांत करू शकले नाही. बांधकाम खात्याला त्या पुलाचे रेलिंग महापुराच्या पाण्याने वाहून गेले आहेत. याची माहिती आहे किंवा नाही? हेदेखील प्रश्नचिन्ह आहे. त्याचे कारण स्थानिक ग्रामस्थांचे म्हणण्यानुसार बेंडसे वावे या पुलाचे पावसाळ्यात महापुराच्या पाण्याने नुकसान झाले असल्याची माहिती घ्यायला सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोणतेही अधिकारी तसेच कर्मचारी आले नाहीत.

पुलाच्या पावसाळ्यात वाहून गेलेल्या लोखंडी रेलिंग बद्दल बांधकाम खात्याने कोणतीही कार्यवाही केली नसल्याबद्दल स्थानिक ग्रामस्थ गणेश धारणे यांनी नाराजी व्यक्त केली. सार्वजनिक बांधकाम विभाग बेंडसे वावे पुलाची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

## मोरे महाविद्यालयात विज्ञान मेळावा

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे महिला महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र आणि रसायनशास्त्र विभागाने तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या शाळेत 'विज्ञान प्रयोगांचा मेळावा' आयोजित करून थोर शास्त्रज्ञ डॉ.सी.व्ही.रमण यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला.

रोहातील वतीने पीएमश्री राजिप केंद्र शाळा (कोलाड), एम. बी. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल (वरसे) आणि डॉ. सी. डी. देशमुख माध्यमिक विद्यालय (रोहा) या शाळांना मोरे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांनी भेट दिली. विद्यार्थिनींनी शाळेतील मुलांना विज्ञान दिनाचे महत्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांना महत्वाच्या शास्त्रज्ञाबद्दल माहिती दिली आणि त्यांच्या संकल्पनाशी संबंधित प्रयोग करून दाखवले. प्राण्याचे, कीटकांची जीवनप्रणाली यांचे नमुने दाखवून आणि त्यामागील शास्त्रदेखील समजावले. विज्ञान दिनानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा घेऊन प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

या उपक्रमात डॉ. सी. डी. देशमुख माध्य विद्यालय यांचे श्री. म्हात्रे, सौ. गुरव, सौ. कदम, सौ. तपकिरे, सौ. घोडिदे, श्री. भालेकर, तसेच एम. बी. पाटील इंग्लिश मीडियम स्कूलच्या सौ देसाई, श्री कुथे, सौ रुकसाना आणि राजिप केंद्रशाळा कोलाड शाळेचे नंदकुमार तेलंगे, सौ. कलमकर, प्रवीण घाग आणि सहकारी उपस्थित होते.

या उपक्रमाचे नियोजन प्रा. दीपाली वांरगे, प्रा. प्रतिमा भोईर यांनी केले आणि प्रा. ममता बिंद, प्रा. अक्षता ठाकूर, प्रा. ऋतुजा कांबळे, प्रा. जुईली देशमुख, प्रा. विजेता पडवळ यांनी देखील सहभाग घेतला.



## मुस्लिम बांधवांचे रमजान रोजे सुरू


**माणगाव : प्रतिनिधी**

इस्लामी शाबान महिन्यानंतर रमजान महिना सुरू होतो. १ मार्च २०२५ रोजी सायंकाळी चंद्र दर्शन झाल्यावर पवित्र रमजान महिना सुरू होऊन मुस्लिम बांधवांचे २ मार्चपासून पवित्र रमजानचे रोजे सुरू झाले आहेत.

इस्लाम धर्मात नमाज, रोजा, जकात, हाज, इमान ही पाच मूलभूत तत्वे मानली जातात. त्यापैकी रोजा हा एक असून पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम बांधव अल्लूहाच्या नावावर पवित्र रमजानचे रोजे महिनाभर धरीत असतात. पहाटे ३ वाजता उठून मुस्लिम भगिनी स्वयंपाक करतात. त्यानंतर पहाटेच्या बांगी अगोदर सहेरी करणे म्हणजेच थोडे फार खाऊन रोजा मुस्लिम बांधव अल्लाहाच्या नावाने धरतात. हा रोजा सायंकाळी मगरीब नमाजच्या बांगी बरोबर सोडला जातो त्यास इफ्तारी असे म्हणतात.

या पवित्र रमजान महिन्यात रोजे करण्याबरोबरच नमाज , कुराण पठण करणे, तराविहची नमाज व दान धर्मावर मुस्लिम बांधवांचा जास्त भर असतो. या महिन्यात मुस्लिम मोहल्ल्यांतून आल्हाददायक असे वातावरण असते. महिन्या भराचे रोजे होऊन चंद्र दर्शन झाल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी रमजान ईद साजरी केली जाते.

## आंतरराष्ट्रीय मंदिर एक्सप्रोमध्ये बल्लाळेश्वर देवस्थान सहभागी



**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रख्यात असे पाली येथील श्री बल्लाळेश्वर देवस्थान विविध उपक्रमांतून प्रगतिपथावर आहे. त्यामुळे जगभरातील मंदिरांना एकत्र आणणारी संस्था टेंपल कनेक्ट या संस्थेद्वारे आयोजित तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय मंदिर अधिवेशन आणि एक्सप्रो २०२५- ITCX२५ या अधिवेशनात श्री बल्लाळेश्वर देवस्थान सहभागी झाले होते.

श्री क्षेत्र तिरूपती येथे या अधिवेशनात सुमारे ३२ देशांतील, हिंदु, बौध्द, जैन व शीख धर्मांची १५०० मंदिरे म्हणजेच त्यांचे विश्वस्त व प्रतिनिधी एकत्र आले होते. याद्वारे मंदिरासाठी सर्वच दृष्टीने एक शक्तीशाली नेटवर्किंग तयार करून व त्या अनुषंगाने मंदिरांचे संवर्धन, व्यवस्थापन अशा अनेक विषयांसाठी या अधिवेशनाचे व कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यांचे आमंत्रण श्री बल्लाळेश्वर देवस्थानला आले. अशा प्रचंड भव्य, महत्त्वाच्या, मानाच्या कार्यक्रमाचे आमंत्रण येणे आणि त्यात सहभागी होणे हा एक उत्तम दैवयोगच आला असे बल्लाळेश्वर देवस्थानाचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे यांनी सांगितले. अध्यक्ष जितेंद्र गद्रे यांच्या समवेत विश्वस्त डॉ. पिनाकीन कुंटे व विश्वास गद्रे या दोन विश्वस्त यांनी या अधिवेशनाला हजेरी लावली.

जितेंद्र गद्रे यांनी या भव्य व्यासपीठावर आपले विचार मांडले. अशा कार्यक्रमांमधे सहभाग मिळून देवस्थाचा विकास होईल, असे मत अनेकांनी मांडले.

## वॉरियर्स क्लबच्या नक्ष गावडेचा गौरव



**माणगाव : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथील प्रख्यात 'वॉरियर्स क्लब'चा बाल योद्धा नक्ष दिक्षा मयूर गावडे या बालयोद्ध्याचा युनिक वर्ल्ड रेकॉर्डस्मध्ये विश्वविक्रम केल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते नुकताच वडगाव माणगाव येथे गौरव करण्यात आला.

नक्ष गावडे हा उलवे नोड येथील वॉरियर्स क्लबचा प्रशिक्षणार्थी असून प्रशिक्षक ओमकार सागर रंधवे व ऋतुजा सागर रंधवे यांच्या मार्गदर्शनाखाली तो लाठी-काठी, दांडपट्टा, तलवारबाजी आदी शिवकालीन पारंपरिक मातीतल्या मर्दानी खेळांचे प्रशिक्षण घेतो. सन ऑफ मराठा युवा प्रतिष्ठान, वडगाव यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवज्योत सोहळा व महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. किल्ले रायगड ते वडगाव अशी शिवज्योत मिरवणूक काढून छत्रपती शिवरायांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

नक्ष गावडेचा मंत्र्यांच्या हस्ते सत्कार झाल्याबद्दल वॉरियर्स क्लबचे संचालक आणि प्रशिक्षक ओमकार सागर रंधवे व कुमारी ऋतुजा सागर रंधवे तसेच क्लबचे अध्यक्ष सागरकुमार रंधवे आणि मान्यवरांनी त्याचे विशेष कौतुक आणि अभिनंदन केले.

## आरोग्य तपासणी मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ सोहळा

**चौक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम चौक येथील दगडी शाळेत चौक ग्रामीण रुग्णालय यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांच्या उपस्थितीत दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन झाले.

सन २०१३ पासून हा कार्यक्रम कार्यरत असून यामध्ये ० ते १८ वर्ष वयोगटातील बालक व विद्यार्थी यांची वैद्यकीय पथकामार्फत आरोग्य तपासणी करण्यात येते. कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी व सर्वसामान्य जनतेमध्ये कार्यक्रमाची प्रसिद्धी होण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांचे संकल्पनेतून राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम २.० विशेष मोहीम जिल्हास्तरीय शुभारंभ सोहळा आज रायगड जिल्हा परिषद चौक खालापूर येथे कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

ग्रामीण रुग्णालय चौक वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता काळेल, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शाह, तालुका आरोग्य कार्यालयाचे अंबुर्ले, केंद्रप्रमुख पडवी, शाळेच्या मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत वैदकीय पथकाद्वारे विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून समुपदेशन करण्यात आले.

## वाचनालयातर्फे हस्ताक्षर स्पर्धा

**पोलादपूर :** मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून तालुका वाचनालय, पोलादपूर यांच्या वतीने हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत पाचवी ते सातवीमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रमुख पाहुणे प्रमोद दीक्षित तसेच चेअरमन डॉ. संजय विठ्ठल शेठ, चेअरमन अपर्णा भागवत आणि आणि इतर संचालक व कर्मचारी उपस्थित होते. स्पर्धेसाठी 'प्रतिज्ञा' हा विषय देण्यात आला. विद्यार्थ्यांनी सुलेखन कौशल्याचा वापर करून मराठी प्रतिज्ञा सुंदर आणि आकर्षक अक्षरशैलीत लिहून सादर केली.


### जाहीर प्रसिध्दीकरण

**रवि केम डाय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या, तळोजा, ता. पनवेल, जि.रायगड.,** या सहकारी संस्थेचा सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणुक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. ०३/०३/२०२५ ते ०७/०३/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. १०/०३/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि.१२/०३/२०२५ ते २६/०३/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक १३/०४/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(अश्विनी शिंदे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**


## शिक्षक सहकारी पतपेढीच्या चेअरमनपदी राजेश सुर्वे



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक पतपेढी अलिबागच्या चेअरमन पदासाठीची निवडणूक बिनविरोध झाली. चेअरमनपदी रोजी सुर्वे यांची निवड करण्यात आली. सलग २५ वर्षे संचालक असलेले राजेश सुर्वे हे पाचव्यांदा चेअरमनपदाची धुरा सांभाळत आहेत.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था प्र. का. जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या सभागृहात यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हात्रे, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष उदय गायकवाड, जिल्हा कार्यवाह विजय पवार, संस्थेचे संचालक नरेंद्र गुरव, उमेश महाडेश्वर, जितेंद्र बोडके, भगवान घरत, रवींद्र पालकर, सुशील वाघमारे, निलेश साळवी, देवानंद गोगर, रेश्मा धुमाळ, राजेंद्र पाटील, प्रतिभा पाटील, प्रमोद भोपी, राजेंद्र फुलावरे, प्रफुल्ल पवार, बालाजी गुबनरे हे उपस्थित होते.

पतसंस्थेच्या कारभाराबरोबरच राजेश सुर्वे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाची सन २०१६ पासुन यशस्वी धुरा सांभाळत आहेत.

## चौक शाळेत मराठी भाषा गौरव दिन आणि राष्ट्रीय विज्ञान दिन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मराठी भाषा गौरव दिन २७ फेब्रुवारी व राष्ट्रीय विज्ञान दिन २८ फेब्रुवारी हे दोन्ही कार्यक्रम संयुक्तरित्या चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयात मोठ्या आनंदात साजरे करण्यात आले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्रभाई शहा आणि व्यासपीठावरील मान्यवरांनी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्रेष्ठ कवी, साहित्यिक वि. वा. शिरवाडकर आणि नोबेल पुरस्कार विजेते महान वैज्ञानिक डॉ. सी व्ही रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विज्ञानाच्या प्रतिकृतीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थी मनोगतामध्ये आस्मी पाटील, श्राव्या मोरे, आर्या देशमुख यांनी मराठी भाषा गौरव दिन, वि .वा. शिरवाडकर आणि डॉ. सी. व्ही. रमण. यांच्याविषयी अतिशय सुरेख माहिती सांगितली शिक्षक मनोगतामध्ये सोनाली पाटील मॅडम आणि सोनाली राणे मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्रभाई शहा यांनी मराठी भाषा दिन व विज्ञान दिन याविषयी विद्यार्थ्यांना खूप छान माहिती सांगितली. या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका कांता पुजारी, उपमुख्याध्यापक दिलीप मुळीक पर्यवेक्षक देवानंद कांबळे संस्थेच्या संचालिका व प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सुलभा गायकवाड उपस्थित होते. सूत्रसंचालन शरद कुंभार, आभार कल्पना देशमुख यांनी मानले.


### दैनिक रामप्रहर
**वर्तमानपत्राची मालकी व इतर संबंधीचे निवेदन**

(सेंट्रल रूल्स, १९५६ नियम ८ अन्वये)

**प्रकाशन स्थळ :** अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित
**प्रकाशनाचे कालमान :** दैनिक
**मुद्रकाचे नांव :** कृष्णा चांगू ठाकूर
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** प्लॉट नंबर ६, रोड नंबर ६, सेक्टर १९, श्रेयस हॉस्पिटलसमोर, नवीन पनवेल.
**प्रकाशकाचे नांव :** कृष्णा चांगू ठाकूर
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** प्लॉट नंबर ६, रोड नंबर ६, सेक्टर १९, श्रेयस हॉस्पिटलसमोर, नवीन पनवेल.
**संपादकाचे नांव :** देवदास लक्ष्मण मटाले
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** टॉवर ५, फ्लॅट नं. ६४, गोदरेज गार्डन इन्क्लेव्ह, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०० ०७९

मी **कृष्णा चांगू ठाकूर** याद्वारे असे जाहीर करतो की, वरील दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.

दि. ०२ मार्च २०२५

**सही/-**
**कृष्णा चांगू ठाकूर**
**(प्रकाशकाची सही)**

# खालापूर नगरपंचायतीत घरपट्टी पावती घोटाळा

## ऑनलाईन पावत्या रद्द करून रक्कम परस्पर हडप

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायत कार्यालयात वर्षभरापूर्वी झालेल्या घोटाळ्याची पुनरावृत्ती झाली असून घरपट्टी भरणा केला असतानादेखील अनेकांच्या ऑनलाईन पावती रद्द करून लाखाची रक्कम हडप केल्याचे लेखापरीक्षणात उघड झाले आहे. या प्रकारामुळे खळबळ माजली आहे.




जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालावधीतील दैनंदिन घरपट्टी भरणा चलन व घरपट्टी पावती यांच्या लेखापरीक्षणात ऑनलाईन पद्धतीने तयार करण्यात आलेल्या पावत्या संबंधित पावती रक्कम लेखापालांकडे जमा न करता नगरपंचायतीमधील कर्मचारी यांचे लॉग इन आयडी वापरून रद्द केल्याचे दिसून आल्याने घोटाळा उघडकीस आला आहे. रद्द करण्यात आलेल्या पावत्यांबाबत कोणत्याही प्रकारची नोंद तथा अहवाल आढळून आलेली नाही. मालमत्ताधारकाने नगरपंचायतीस भरलेली रक्कम दिवसअखेर लेखापाल, रोखपाल यांच्याकडे जमा न करता, पावती लॉग- इन आयडीवरून रद्द केल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले.

रद्द करण्यात आलेल्या पावत्यांचा अहवाल तपासला असता एकूण ४९ पावत्या रद्द झाल्याचे लेखापरीक्षणात आढळले आहे.

या पावत्यांच्या रद्द प्रती व रद्द पावती नोंदवही याबाबत कोणताही कार्यालयीन अभिलेख लेखापरीक्षणात आढळून आलेली नाही. नागरिकांच्या कररुपी पैशाचा अपहार करणाऱ्या दोषींवर फौजदारी कारवाईची मागणी नागरीक करत आहेत.

### रात्रीस खेळ चाले!

***दैनंदिन भरणा त्याच दिवशी सायंकाळी ६.१५पर्यंत रोखपाल, लेखापाल यांच्याकडे जमा करणे आवश्यक असते. गेल्या वर्षी अशाच प्रकारच्या भ्रष्टाचारात गुन्हा दाखल झालेल्या कर्मचाऱ्याने ार्थिक व्यवहार करण्याची परवानगी नसताना लॉग इन आयडी वापरून पावत्या तयार केल्याचे समोर येत आहे. रात्री १०:३३ मिनिटांनी अवैधरित्या लॉग इन आयडी वापरून भरणा झालेल्या पावत्या रद्द करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे.***

**खालापूर नगरपंचायतीमध्ये याआधीदेखील घरपट्टीमध्ये भ्रष्टाचार झाला आहे. एकीकडे घरपट्टी व पाणीपट्टीत अवास्तव वाढ करायची अणि दुसरीकडे माहितीच्या अधिकारात माहिती मागविली असता त्यात भ्रष्टाचार झालेला आहे असे समजते. याची पाळेमुळे खोलवर गेली असून त्याची उच्चस्तरीय चौकशी होणे आवश्यक आहे. तोपर्यंत नागरिकांच्या वतीने घरपट्टी न भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

**–ॲड. राकेश गवाणकर**, खालापूर

**मी दोन-तीन महिन्यांपूर्वी पदभार स्वीकारला असून झालेला प्रकार उघडकीस आल्यानंतर तातडीने चौकशी सुरू केली आहे. दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल.**

**–वैभव गारवे**, प्रभारी मुख्याधिकारी, खालापूर नगरपंचायत

# मौलाना आझाद योजनेचा अल्पसंख्याक विद्यार्थिनींनी लाभ घ्यावा- मुश्ताक अंतुले

**मुरुड : प्रतिनिधी**

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ घेऊन यांचा फायदा घ्यावा, असे आवाहन मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित मुंबई अध्यक्ष मुश्ताक अंतुले यांनी केले आहे.

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी सरकारी योजना आणि इतर लाभार्थ्यांसाठी कोकण उन्नती मित्र मंडळाच्या वसंतराव नाईक कला आणि वाणिज्य महाविद्यालयात अंजुमन इस्लाम जंजिरा पदवी विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मुश्ताक अंतुले बोलत होते.

या कार्यशाळेस मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक अहमद शरीफ बासीद देशमुख, गफार पी. मगदूम, एस. जैनुद्दीन एस. उमर कादिरी, अंजुमन इस्लाम जंजिरा पदवी विज्ञान महाविद्यालये प्राचार्य डॉ. साजिद शेख, वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जनार्दन कांबळे, सुभाष महाडिक, वासंती उमरोटकर, हसमुख जैन, डॉ. श्रीशैल बहिरगुडे, फैरोज घलटे, अविनाश म्हात्रे, डॉ. सुभाष म्हात्रे, ॲड. इस्माईल घोले, समिर दैवनाक, रूपेश मोरे, निदा गोरमे, डॉ. मुरलीधर गायकवाड, गजानन मुनेश्वर आदी उपस्थित होते.

या वेळी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित मुंबईच्या अध्यक्षपदी मुश्ताक अंतुले यांची निवड झाल्याने त्यांचा वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या वतीने वासंती उमरोटकर यांच्या शुभ हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोपाची कुंडी देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

मुश्ताक अंतुले पुढे म्हणाले की, मौलाना आझाद शैक्षणिक कर्ज योजना ही राज्य शासनामार्फत भाग भांडवल स्वरूपात प्राप्त होणाऱ्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजना आहे. अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज योजना आहे. डॉ एपीजे अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजना ही राष्ट्रीय अल्पसंख्याक एवं वित्त निगम नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राबविण्यात येणारी योजना आहे.

अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची सूक्ष्म पतपुरवठा योजना मौलाना आज़ाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई बचत गटांना ३० लाखांपर्यंत कर्ज योजना असून विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी यांचा फायदा घेऊन उच्चशिक्षित बनवू. नुकतीच या योजनेमधून रत्नागिरी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन उच्चशिक्षण घेण्यासाठी रशियाला गेला. त्याला २२ लाख रुपये देण्यात आले आहे. आपल्या जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुश्ताक अंतुले यांनी केले.

या वेळी अनेक मान्यवरांनीही आपल्या भाषणात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी या सरकारी योजनांचा लाभ घ्यावा असे सांगितले. सूत्रसंचलन निदा गोरमे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ.सीमा नाहिद यांनी मानले.







# बोरघाटात रुग्णवाहिकेला अपघात

**एक जण जखमी**

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर बोरघाटातील दत्त मंदिराजवळ हिंगोली येथून मुंबई सायन येथे आजारी व्यक्तीला उपचारासाठी दाखल करण्यासाठी रुग्णवाहिकेतून (जीजे २७ टीडी ७१४९) नेले जात असताना अतिवेगात नियंत्रण सुटल्याने रुग्णवाहिकेने समोर जाणाऱ्या अज्ञात वाहनाला पाठीमागून धडक दिली. या धडकेत आजारी व्यक्ती गंभीर जखमी झाला आहे.

जखमी व्यक्तीला खोपोलीतून अन्य रुग्णवाहिकेतून तातडीने सायन येथे उपचारार्थ रवाना करण्यात आले. हा अपघात शनिवारी (दि. १) दुपारी १.३०च्या सुमारास घडला. या अपघातात ॲम्ब्युलन्सचेही नुकसान झाले आहे.

# खोपोलीत आरोग्य शिबिरास प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीचे माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ उद्योजक स्व. एल.एम. साबळे यांच्या ३२व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त महाराजा मंगल कार्यालयात महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास प्रतिसाद मिळाला.



प्रारंभी स्व. साबळे यांच्या प्रतिमेस त्यांच्या पत्नी माजी नगरसेविका काशीबाई साबळे यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यानंतर त्यांचे चिरंजीव उद्योजक यशवंत साबळे, रेणुका साबळे, माजी नगरसेवक तुकाराम साबळे, नातू विक्रम साबळे व कुटुंबातील सदस्यांनी अभिवादन केले. या शिबिरात समर्पण रक्तपेढीच्या साह्याने ६७ जणांनी रक्तदानाचे सामाजिक कर्तव्य पार पाडले, नेत्रतपासणी शिबिरात १७१ जणांनी तर, कॅन्सरपूर्व तपासणी शिबिरात ७५ जणांनी भाग घेतला. नेत्र शिबिरातील पाच जणांना मोतीबिंदू शस्त्रक्रियासाठी पाठविण्यात आले. काशी होमच्या संचालिका रेणुका साबळे व विक्रम साबळे यांनी प्रथम रक्तदान करून शिबिराचे उद्घाटन केले.

या शिबिराला माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, माजी उपनगराध्यक्ष श्रीकांत पुरी, माजी नगरसेवक चंद्राप्पा अनिवार, कैलास गायकवाड, संजय पाटील, अविनाश तावडे, मनीष यादव, भाजपचे सूर्यकांत देशमुख, युवक राष्ट्रवादीचे अतुल पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्याम कांबळे, रवी रोकडे, रिपाइंचे प्रमोद महाडिक, शिवसेनेचे दिनेश थोरवे, तंत्रनिकेतनचे प्रा. अविनाश मोरे, राष्ट्रीय पंच शरद कदम, युवा उद्योजक सुहास वझरकर, मीतेश शहा, निवृत्त शिक्षक राजाबापू सगळगीले, मंटो खान आदींनी भेट देऊन साबळे कुटुंबियांचे कौतुक केले.

# संगीता उतेकर यांना पीएचडी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द.ग.तटकरे महाविद्यालयात असोसिएट प्रोफेसर संगीता गंगाराम उतेकर या ग्रंथापाल आहेत. त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठ ग्रंथालय सेवेचे विपणनशास्त्र : एक विश्लेषणात्मक अभ्यास या विषयात पीएचडी प्राप्त केली आहे.

या यशाबद्दल माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयाचे चेअरमन ॲड. विनोद घायाळ, संचालक नितीन बामगुडे, सह्याद्री बँकेचे संचालक वैभव साबळे, तटकरे महाविद्यालयाचे प्राचार्य खामकर, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या बोरुळे आदींनी अभिनंदन केले.

# शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक योजनेमध्ये नोंदणी करावी

## कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांचे आवाहन

**मुरुड : प्रतिनिधी**

कृषी क्षेत्रामध्ये डिजिटल सेवांचा उपयोग वाढविण्यासाठी केंद्र सरकारने ग्रीस्टॅक ही योजना सुरू केली आहे. १४ ऑक्टोबर २०२४पासून महाराष्ट्रसह देशातील २४ राज्यांमध्ये ही योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांची माहिती एकाच ठिकाणी संकलित करून त्यांना विशिष्ट ओळख क्रमांक प्रदान करणे आणि त्याद्वारे केंद्र व राज्य शासनाच्या कृषी योजनांचा त्वरित लाभ मिळवून देणे हा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या योजनांचा लाभ अधिक सोपे आणि जलद पद्धतीने मिळेल.

कृषी क्षेत्रातील डेटा अधिक चांगल्या प्रकारे वापरला जावा आणि शेती अधिक फायदेशीर व्हावी यासाठी शेतकऱ्यांनी या योजनेत लवकरात लवकर नोंदणी करून आपल्या शेतीच्या विकासाला गती द्यावी, असे आवाहन मुरुड तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी केले आहे.

या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जमिनीची माहिती तसेच हवामान आणि शेतीशी संबंधित इतर महत्त्वाचे डेटा गोळा करून त्यांचे सतत अद्ययावतीकरण केले जाईल याशिवाय शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ तसेच कर्ज आणि कृषी विमा सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध करून देण्याचा योजनेचा उद्देश आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांची कर्ज प्रक्रिया वेगवान होऊन शेती विकासासाठी अधिक सहाय्य मिळेल.



शेतकऱ्यांना सरकारी कार्यालयांमध्ये वारंवार चकरा मारण्याची गरज भासणार नाही. पिक विमा आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात नुकसानभरपाईसाठी सर्वेक्षण करणे अधिक सोपे होईल. शेतकरी त्यांची किमान आधारभूत किमतीवर खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी करू शकतील, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक होईल.

शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. योजनेत नोंदणी करण्यासाठी प्रत्येक सीएससी सेंटरवर कॅम्पचे आयोजन करण्यात आले असून शेतकऱ्यांनी तेथे जाऊन नोंदणी करून घेण्यात यावी.

त्यासाठी तलाठी कृषी सहाय्यक व ग्रामविकास अधिकारी या योजनेची प्रचार प्रसिद्धी करत आहेत. ही योजना केवळ शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी नव्हे; तर संपूर्ण कृषी व्यवस्थेला डिजिटल आणि पारदर्शक बनवण्यासाठी आणलेली आहे. भविष्यात या योजनेच्या मदतीने शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडले जातील, अशी माहिती कृषी विभागाने दिली.

# संगीत रजनीने कर्जतकरांची मने जिंकली

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात स्वर बरसातने संगीत रजनीचे आयोजन महाशिवरात्रीनिमित्त केले होते. विशेष म्हणजे यामध्ये कर्जतमधील स्थानिक गायकांनी विविध गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कर्जत शहरातील श्री कपालेश्वर मंदिरामध्ये महाशिवरात्रीनिमित्त स्वर बरसात प्रस्तुत संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. देवस्थान समितीचे अध्यक्ष महेंद्र बोडके यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यांनतर संगीत मैफिलीला शुभारंभ करण्यात आला. मंदार भिडे, सई जोशी, मुग्धा पेंडसे, अक्षय जोशी या गायकांनी तू सुखकर्ता.., माझी रेणुका माऊली..., नाम तुझे बरवे गा..., बाई मी विकत घेतला शाम..., विठ्ठल आवडी..., भरजरी ग पितांबर..., या जन्मावर..., ही वाट दूर जाते..., लाजून हसणे..., परीकथेतील राजकुमारा..., प्रथम तूज पाहता..., नवीन आज चंद्रमा..., सख्या रे घायाळ मी हरिणी..., गोमू संगतीनं..., राधा ही बावरी..., मल्हार वारी... अशी एका पेक्षा एक गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या गायकांना विनय चेऊलकर यांनी सिंथेसायझर, मंदार तांडेल यांनी बासरी, मनिष ठुंबरे यांनी ढोलकी व ढोलक आणि विवेक भागवत यांनी तबल्यावर साथ संगत दिली. निवेदन अनुया गरवारे-धारप यांनी केले.

या कार्यक्रमास अभिजीत मराठे, पांडुरंग गरवारे, गौतम वैद्य, दत्तात्रेय भागवत, शैलेश सातपुते, रिमा वैद्य, अचला मेढी, विनीत जोशी, यश हजारे, सदानंद जोशी, समीर सोहोनी, लीलाताई चंदन, डॉ. नितीन आरेकर, विराज वैद्य, महेंद्र ढाकवळ, प्रकाश पटवर्धन, बल्लाळ जोशी, राजेंद्र दगडे, पंकज शहा आदी कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# घुमेश्वर येथे पाण्याच्या टाकीचे लोकार्पण

**माणगाव : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यातील घुमेश्वर गावाला पाणीपुरवठा साठवण टाकीची आवश्यकता होती. गावची ही गरज लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाळुक यांच्या प्रयत्नातून उद्योगपती दीपक अग्रवाल यांच्या अर्थसहाय्याने स्व. सावित्रीबाई गौरीशंकर अग्रवाल यांच्या स्मरणार्थ पाणी साठवण टाकी बांधून देण्यात आली. याचे लोकार्पण नुकतेच करण्यात आले.

या कार्यक्रमास नाना पालकर स्मृती समितीचे व्यवस्थापक रायगडभूषण कृष्णा महाडिक, गावचे अध्यक्ष मधुकर गायकर, श्रीकांत बिरवाटकर, समीर गायकर, प्रकाश धुमाळ, संजय लटके, जगदीश लटके, धोंडू घोले व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. घुमेश्वर हे अत्यंत दुर्गम गाव असून पाणी साठवण टाकी उपलब्ध झाल्याने ग्रामस्थ विशेषतः महिला मंडळाने आनंद व्यक्त करून आभार व्यक्त केले आहेत.

# जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे मराठी भाषा गौरव दिन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आणि सार्वजनिक वाचनालय डोंगरे हॉल यांच्या वतीने कविवर्य वि.वा. शिरवडकर तथा कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी मराठी भाषा गौरव दिन डोंगरे हॉल येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला लेखक, कवी, साहित्यिक, पत्रकार व वाचक उपस्थित होते.



परिस्थितीअभावी आपले साहित्य छापू न शकणाऱ्या छोट्या साहित्यिकाना शासनाने मदत करावी तसेच दर्जेदार लिखाणासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची मदत घ्यावी, असे मत लेखक ॲड. विलास नाईक यांनी या वेळी व्यक्त केले. लेखक म्हणून काम करताना ग्रंथालयातील वाचलेल्या ग्रंथाचा फार उपयोग झाल्याचा तसेच समाजमाध्यमातून प्रकाशित होणाऱ्या दर्जेदार साहित्याचे संकलन करण्यात यावे, असे प्रतिपादन वर्षा कुळवेकर यांनी केले.

मराठी भाषेचे जतन व संवर्धन करायचे असेल तर सुरुवात आपल्याला घरातूनच करावी लागेल, असे मत शैला पाटील यांनी व्यक्त केले. मराठी भाषेचा वापर दैनंदिन जीवनात करण्याबाबत श्रुती राजे देसाई यांनी आवाहन केले.

अभिजात भाषा केवळ कागदावर लिहून चालणार नाही तर तिचा प्रभावी वापर दैनंदिन जीवनात कारवा, मराठी वृत्तपत्र, नियतकलिके प्रत्येक घरात नियमित यायला हवेत, असे मत जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी व्यक्त केले.

सूत्रसंचालन संतोष बोन्द्रे यांनी केले. कार्यक्रमास अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर, ज्येष्ठ पत्रकार हर्षद कशाळकर, ग्रंथमित्र नागेश कुलकर्णी, भालचंद्र वर्तक, हेमकांत सोनार, अनंत देवघरकर आदी उपस्थित होते.

# ऑस्ट्रेलिया चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमी फायनलमध्ये

## अफगाणिस्तानविरुद्धचा सामना पावसामुळे रद्द; दोघांना प्रत्येकी एक गुण

**लाहोर : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमी फायनलच्या दृष्टीने अफगाणिस्तान-ऑस्ट्रेलिया सामना खूप महत्त्वाचा होता. या सामन्याचा विजेता संघ ब गटातून चॅम्पियन्स ट्रॉफी उपांत्य फेरीत जाणारा पहिला संघ ठरणार होता, पण अफगाणिस्तानची फलंदाजी झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या डावात १२ षटके होताच पावसाने जोरदार हजेरी लावली. पावसामुळे सामना रद्द करण्यात आला. यासह ऑस्ट्रेलिया संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला



अफगाणिस्तान ऑस्ट्रेलियाचा सामना पाऊस पडल्याने रद्द करण्यात आला. पावसाने जोरदार हजेरी लावल्यानंतर बराच वेळ थांबून मैदान सामन्यासाठी पुन्हा तयार होते की नाही याचे पंचांनी निरीक्षण केले, पण लाहोरच्या या मैदानावर प्रचंड पाणी असल्याने सामना रद्द करण्यात आला. भारतीय वेळेनुसार रात्री ९.२० वाजता पंचांनी सामना रद्द केल्याची घोषणा केली. पावसामुळे सामना रद्द झाल्याने दोन्ही संघांना एक-एक गुण मिळाला. ऑस्ट्रेलिया संघ सर्वाधिक चार गुणांसह उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला.

अफगाणिस्तान संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. ऑस्ट्रेलियाने सामन्यात दणक्यात सुरुवात केली, पण अफगाणिस्तानने हार मानली नाही आणि शेवटपर्यंत उत्कृष्ट फलंदाजी करत २७३ धावांची सन्मानजनक धावसंख्या उभारली. सदिकउल्ला अटलने ९५ चेंडूत तीन षटकार आणि सहा चौकारांच्या मदतीने ८५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. यानंतर संघाचा अष्टपैलू खेळाडू अजमतुल्ला ओमरझाईने वादळी खेळी केली आणि संघाची धावसंख्या २५०पार नेऊन ठेवली. ओमरझाईने ६३ चेंडूत पाच षटकार आणि एका चौकाराच्या मदतीने ६७ धावा केल्या.

पावसामुळे सामना थांबवण्यात आला तेव्हा ऑस्ट्रेलियाने २७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना १२.५ षटकात १ बाद १०९ धावा केल्या होत्या. ट्रॅव्हिस हेड जबरदस्त फॉर्मात होता. त्याने ४० चेंडूत नऊ चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने ५९ धावा केल्या होत्या.

# उरणच्या कराटेपटूंची चॅम्पियनशिपमध्ये चमक

**उरण : बातमीदार**

पनवेल तालुक्यातील युसुफ मेहर अली सेंटरचे भानुबेन प्रवीण शहा माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे शोके कप कराटे चॅम्पियनशिप २०२५चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उरणच्या विजय विकास सामाजिक संस्था अंतर्गत सेल्फ डिफेन्स कराटे ऑल स्टाईल कराटे इन्स्ट्रक्टर असोशिएयन अकॅडमीने चमक दाखवली.



या अकॅडमीतील एकूण २५ कराटेपटूंनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यांनी २० सुवर्ण, नऊ रौप्य व १० कांस्य अशी एकूण ३९ पदके पटकावली. यामध्ये शुभम घोगरे, निशांत नराळे, यश ठाकूर, कुशल म्हात्रे, दीक्षा वगरे काता कुमिते सुवर्ण, श्लोक पाटील, स्वरा पेडवी काता सुवर्ण व कुमिते रौप्य, चैतन्य स्वार, जय नोले कुमिते सुवर्ण व काता रौप्य, मानवी राजपूत, अथर्व फड, सांची म्हात्रे कुमिते सुवर्ण, स्वरा जाधव, ऋत्विक ठाकूर सुवर्ण, साईराज कडू कुमिते व काता रौप्य, अरविंद वाकसे कुमिते रौप्य व काता कांस्य, सार्थ म्हात्रे काता व कुमिते रौप्य, शिवांश सिंग काता कुमिते रौप्य, शिवन्या भोर, झारा पटेल, पार्थ ठाकूर, राज म्हात्रे कुमिते रौप्य, समर्थ भडांगे, रियांशी कुलेल याने कांस्यपदक जिंकले.

यशस्वी कराटेपटूंचे मास्टर दीपक घरत, विकास भोईर, प्रगती भोईर, अथर्व घरत तसेच विजय विकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आणि माजी जि.प. सदस्य विजय भोईर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# वूमन्स प्रीमियर लीगमध्ये दिल्लीचा मुंबईवर मोठा विजय

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

वूमन्स प्रीमियर लीग २०२५ महत्त्वपूर्ण वळणावर आहे. यादरम्यान दिल्ली कॅपिटल्स संघाने चॅम्पियन मुंबई इंडियन्सवर पाच षटके आणि तीन चेंडू राखून मोठा विजय मिळवला. या विजयासह दिल्लीने मुंबईकडून गुणतालिकेतील पहिले स्थानही हिसकावून घेतले आहे.



मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना अवघ्या १२३ धावा केल्या होत्या. मुंबईने दिलेल्या १२४ धावांचे लक्ष्य दिल्लीने एक विकेट गमावत १४.३ षटकांत पूर्ण केले. दिल्ली कॅपिटल्स संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि संघातील गोलंदाजांनी हा निर्णय अगदी योग्य असल्याचे सिद्ध केले. मुंबईकजून यस्तिका भाटिया आणि मॅथ्यूजने चांगली सुरुवात केली होती, पण ठराविक अंतराने गमावलेल्या विकेट्समुळे मुंबईचा संघ मोठी धावसंख्या गाठू शकला नाही. दिल्लीकडून जेस जोनासनने आणि मिन्नू मनी यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेत मुंबईचे कंबरडे मोडले. याशिवाय शिखा पांडे आणि एनाबेल सदरलँड यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.


प्रत्युत्तरात दिल्लीने वादळी सुरुवात केली. मुंबईने दिलेल्या १२४ धावांचे लक्ष्य दिल्लीने एक विकेट गमावत १४.३ षटकांत पूर्ण केले. मेग लॅनिंग आणि शफाली वर्मा यांनी अर्धशतकी भागीदारी करत चांगली सुरुवात करून दिली. शफालीने २८ चेंडूत तीन षटकार आणि चार चौकारांसह ४३ धावांची खेळी केली. यानंतर कर्णधार लॅनिंगने ४९ चेंडूत नऊ चौकारांसह नाबाद ६० धावा केल्या, तर जेमिमा रोड्रिग्जने १५ धावांची खेळी करत कर्णधाराला चांगली साथ दिली.

# ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर मॅथ्यू शॉर्ट दुखापतग्रस्त

**लाहोर : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफीतील ऑस्ट्रेलिया वि. अफगाणिस्तान हा सामना पावसामुळे रद्द झाला आणि यासह ऑस्ट्रेलियन संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५च्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. लाहोरमध्ये अफगाणिस्तानने चांगली धावसंख्या उभारली होती, पण पावसामुळे अफगाणिस्तानला सामन्यात शेवटपर्यंत झुंज देण्याची संधी मिळाली नाही. या दरम्यान ऑस्ट्रेलियाला मोठा धक्काही बसला आहे.

ऑस्ट्रेलियन संघाचा उत्कृष्ट सलामीवीर मॅथ्यू शॉर्टच्या मांडीला दुखापत झाली आहे. यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीसाठी ऑस्ट्रेलियाला आपल्या टॉप ऑर्डरमध्ये बदल करावे लागणार आहेत. अफगाणिस्तानच्या डावात फलंदाजी करताना शॉर्टला दुखापत झाली. तरीही त्याने ट्रॅव्हिस हेडसह फलंदाजीची सुरुवात केली, पण धावा काढण्यासाठी तो संघर्ष करताना दिसला.



### इतर पर्यायांची चाचपणी

दुखापतग्रस्त मिचेल मार्शची जागा घेणारा जेक फ्रेझर-मॅकगर्क हा संघातील अतिरिक्त फलंदाज आहे आणि तो टॉप ऑर्डरमध्ये शॉर्टची जागा घेऊ शकतो. ऑस्ट्रेलियाकडे इतर पर्याय आहेत जसे की अष्टपैलू रॉन हार्डीला संधी दिली जाऊ शकते. डावखुरा फलंदाज आणि डावखुरा फिरकीपटू कूपर कॉनोली हा ट्रॅव्हलिंग रिझर्व म्हणून आहे आणि जर शॉर्टला स्पर्धेच्या उर्वरित सामन्यांमधून अधिकृतपणे वगळले गेले तर त्याचा संघात समावेश केला जाऊ शकतो.

## करूण नायरचे रणजी फायनलमध्ये शतक

**नागपूर : प्रतिनिधी**

विजय हजारे ट्रॉफीमध्ये शतके झळकावणाऱ्या विदर्भचा कर्णधार करुण नायरने रणजी ट्रॉफीमध्येही हाच फॉर्म कायम ठेवत अंतिम सामन्यात शानदार शतक झळकावले. केरळविरुद्धच्या या अंतिम सामन्याच्या पहिल्या डावात शतक हुकलेल्या नायरने दुसऱ्या डावात त्याची भरपाई केली.

सामन्याच्या चौथ्या दिवशी विदर्भाने दुसऱ्या डावात फलंदाजीला सुरुवात केली, पण अवघ्या ७ धावांत दोन विकेट गमावल्या. अशा परिस्थितीत पहिल्या डावातील दोन हिरो दानिश मलेवार आणि करूण यांनी संघाची धुरा सांभाळली. या देशांतर्गत हंगामात करुणने नवव्यांदा शतक ठोकले आहे.

# इंग्लंडच्या खराब कामगिरीनंतर कर्णधार बटलरचा राजीनामा

**लंडन : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५मधून इंग्लंडचा संघ गट टप्प्यातूनच बाहेर पडला. इंग्लंड संघाला अफगाणिस्तानविरुद्ध मोठा लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला होता. या पराभवानंतर इंग्लंड संघाचे चॅम्पियन्स ट्रॉफीतील आव्हान संपुष्टात आले. यासह आयसीसी स्पर्धेतील इंग्लंडची निराशाजनक कामगिरी कायम राहिल्याने इंग्लंडचा कर्णधार जोस बटलर याने इंग्लंडच्या वनडे संघाचा राजीनामा दिला आहे.



इंग्लंडचा माजी विश्वविजेता कर्णधार जोस बटलरने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये इंग्लंड संघाच्या खराब कामगिरीनंतर मोठा निर्णय घेतला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये इंग्लंडला पहिल्या दोन सामन्यांमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. त्यातील दुसरा पराभव अफगाणिस्तानसारख्या छोट्या संघाविरुद्ध झाला. या पराभवासह संघ स्पर्धेतून बाहेर पडला. त्यानंतर चॅम्पियन्स ट्रॉफीतील शेवटच्या गट सामन्यापूर्वी बटलरने कर्णधारपद सोडण्याची घोषणा केली.

बटलरने चॅम्पियन्स ट्रॉफीतील अखेरच्या गट सामन्यापूर्वी पत्रकार परिषदेत ही मोठी घोषणा केली. संघाचे कोच ब्रँडन मॅक्युलम यांच्या समवेत बटलरने उपस्थित राहत राजीनामा दिला. बटलरच्या नेतृत्वाखाली गेल्या १० एकदिवसीय सामन्यांपैकी नऊ सामन्यात इंग्लंडचा पराभव झाला आहे. इंग्लंडने चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारताविरुद्ध झालेल्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत इंग्लिश संघाला एकतर्फी पराभव पत्करावा लागला होता.

# युनूस खानने पैशांसाठी नाकारली पीसीबीची ऑफर

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

इंग्लिश संघाविरुद्धच्या अफगाणिस्तानच्या ऐतिहासिक विजयात पाकिस्तानचा माजी कर्णधार आणि अनुभवी फलंदाज युनूस खानची महत्त्वाची भूमिका असल्याचे मानले जात आहे. या स्पर्धेपूर्वी त्याची अफगाणिस्तान संघाचा मेन्टॉर म्हणून निवड झाली होती, मात्र आता त्यांच्या या निर्णयावरून वाद निर्माण झाला आहे.

पाकिस्तान संघाचा चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील प्रवास गट टप्प्यातच संपला आहे. यजमान संघ असूनही एकही सामना न जिंकता या स्पर्धेच्या पहिल्या फेरीतूनच यजमान पाकिस्तान बाहेर पडला आहे. दुसरीकडे शेजारी देश अफगाणिस्तानने चमकदार कामगिरी करत इंग्लंडचा पराभव करत मोठा अपसेट घडवला.



पाकिस्तानच्या टी-२० वर्ल्डकप विजेत्या संघाचा माजी कर्णधार युनूस खानला पाकिस्तान क्रिकेट बोर्डाकडून चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये काम करण्याची ऑफर मिळाली होती, असा दावा पाकिस्तानचा माजी कर्णधार आणि अनुभवी क्रिकेटपटू रशीद लतीफने केला आहे, पण युनूसने पाकिस्तानी खेळाडूंसह काम करण्यास नकार दिला आणि अफगाणिस्तानसाठी मेन्टॉर होण्याचा निर्णय घेतला. युनूसने पैशासाठी हा निर्णय घेतल्याचे रशीदचे मत आहे. एका पाकिस्तानी चॅनलवर लतीफ म्हणाला, युनिस खानने अफगाणिस्तान संघासह काम करण्यासाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला नकार दिला, कारण इथे पैशाच्या बाबतीत फायदा होणार नव्हता.

### माजी खेळाडूचा आरोप

अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाचे सीईओ नसीब खान हे युनूस खान यांच्या बचावात उतरले होते. त्यांच्या चॅम्पियन्स ट्रॉफी पाकिस्तानमध्ये खेळली जात आहे, त्यामुळे त्यांच्या संघाने यजमान देशाच्या अनुभवी क्रिकेटपटूची मेन्टॉर म्हणून नियुक्ती करणे आवश्यक होते. याआधीही यजमान देशाचा माजी खेळाडू मेन्टॉर म्हणून त्यांनी निवडला आहे, ज्याचा त्यांना फायदा झाला आहे. अफगाणिस्तानने वनडे वर्ल्डकप २०२३ आणि टी-२० वर्ल्डकप २०२४मध्येही मेन्टॉरची नियुक्तीची केली होती.

अफगाणिस्तानलाही यामुळे बऱ्यापैकी यश मिळाले आहे. एसीबीने भारतात आयोजित केलेल्या २०२३च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी माजी भारतीय क्रिकेटपटू अजय जडेजा यांची संघाचा मेन्टॉर म्हणून नियुक्ती केली होती. याचा फायदा संघाला झाला आणि पाकिस्तान आणि इंग्लंडविरुद्ध विजय मिळवला, तर वेस्ट इंडिजमध्ये खेळल्या गेलेल्या टी-२० विश्वचषकादरम्यान अफगाणिस्तान संघाने या कामाची जबाबदारी ड्वेन ब्राव्होकडे सोपवली होती. यादरम्यान त्यांना उपांत्य फेरी गाठण्यात यश आले.

# पाकिस्तानी संघाची खराब कामगिरी सरकारच्याही जिव्हारी

## देशाच्या संसदेत होणार चर्चा?

**कराची : वृत्तसंस्था**

यंदाच्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे आयोजन पाकिस्तानमध्ये करण्यात आले होते. यजमान देश असल्यामुळे स्पर्धेमध्ये पाकिस्तानी क्रिकेट चाहत्यांच्या आपल्या संघाकडून मोठ्या अपेक्षा होत्या. जवळपास २८ वर्षांनंतर पाकिस्तानमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन केले गेले, मात्र या स्पर्धेत पाकिस्तानला गट फेरीतच स्पर्धेतून बाहेर पडावे लागले.

न्यूझीलंडविरुद्ध पराभूत झाल्यानंतर भारताविरुद्धही पाकिस्तानचा दारूण पराभव झाला. बांगलादेशसोबत पावसामुळे सामना न झाल्याने पाकिस्तानला रिकाम्या झोळीनेच घरी परतावे लागले. पाकिस्तान सरकारने आपल्या संघाचा पराभव गांभीर्याने घेतला असून थेट देशाच्या संसदेत टीम पाकिस्तानच्या या अवस्थेवर चर्चा करण्याची तयारी चालवली असल्याचे वृत्त आहे.



स्पर्धेतून एकही सामना न जिंकता बाहेर पडल्यामुळे पाकिस्तान संघावर पाकिस्तानच्या क्रिकेट चाहत्यांकडून, माजी खेळाडूंकडून मोठ्या प्रमाणावर टीका केली जात आहे. सोशल मीडियावर संघाबाबत व संघातील अनेक दिग्गज खेळाडूंबाबत मीम्स व्हायरल होत आहेत. या सर्व वातावरणात आता संघाच्या कामगिरीवर थेट पाकिस्तानच्या संसदेत चर्चा करण्याच्या तयारीत पाकिस्तान प्रशासन असून त्याबाबत पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात आल्याची चर्चा आहे.

पाकिस्तानच्या पंतप्रधानांचे राजकीय सल्लागार राणा सनाउल्लाह यांनी जिओ टीव्ही चॅनलला दिलेल्या प्रतिक्रियेमध्ये पाकिस्तान संघाच्या या कामगिरीसाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला दोषी धरले आहे. पीसीबी ही स्वतंत्र संस्था आहे. त्यांना हवे तसे ते वागू शकतात आणि ते तसेच वागले आहेत, पण त्यांनी जे काही केले आहे, त्याबाबत मी पंतप्रधानांना विनंती करणार आहे की हा मुद्दा केंद्रीय मंत्रिमंडळात व संसदेत चर्चेला घ्यावा, असे राणा म्हणाले.

गेल्या काही दशकांमध्ये पाकिस्तान क्रिकेटमध्ये आणि क्रिकेट बोर्डामध्ये अनेक चढउतार आपण पाहिले आहेत. गेल्या वर्षी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांआधी काळजीवाहू सरकारने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला केंद्र सरकारच्या नियंत्रणातून पूर्णपणे मुक्त केले आहे, असेही राण यांनी नमूद केले आहे.

### 'पीसीबीने हिशेब द्यावा'

पंतप्रधानांचे राजकीय सल्लागार राणा सनाउल्लाह यांनी पीसीबीच्या आर्थिक व्यवहारांवर पाकिस्तान सरकारचे नियंत्रण असण्याची गरज अधोरेखित केली. क्रिकेट बोर्डाच्या उच्चपदस्थांकडून ज्या प्रकारे खर्च केले जात आहेत त्याची सर्व माहिती पाकिस्तानच्या जनतेसमोर व संसदेसमोर यायला हवी. आपल्या संघाच्या मेंटॉर्सला ५० लाख रुपये दिले जात आहेत आणि ते जाहीरपणे माध्यमांमध्ये म्हणतायेत की त्यांच्या जबाबदाऱ्या काय आहेत त्यांना माहितीच नाही. याचा अर्थ काम न करण्याचे ते पैसे घेत आहेत, असेही राणा म्हणाले.

# विराटबद्दल विचारलेल्या प्रश्नावर पाकिस्तानी फॅनचे मजेशीर उत्तर



व्हिडीओ व्हायरल

**लाहोर : वृत्तसंस्था**

विराट कोहली आणि बाबर आझम ही दोन्हीही क्रिकेटच्या दुनियेतील मोठी नावे आहेत. या दोन फलंदाजांचे जगभरात असंख्य चाहते आहेत, पण या दोघांपैकी नेमका कोणता खेळाडू सर्वोत्तम आहे याबद्दल नेहमीच वाद होत आले आहेत. बऱ्याचदा विराटच्या पारड्यात चाहत्यांचे जास्त प्रेम पडल्याचे पहायला मिळते. या दरम्यान सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओची जोरदार चर्चा होत आहे.

यामध्ये पाकिस्तानमध्ये एका क्रिकेट चाहत्याला भारतीय पत्रकाराने विराट कोहली माहिती आहे का? असा प्रश्न विचारला. या प्रश्नावर त्या मुलाने दिलेले उत्तर चर्चेचा विषय बनला आहे. हा मुलगा म्हणाला की, किंग कोहली, परवा त्याने १४०००चे रेकॉर्ड बनवले बाबर आझमचा बाप. ही व्हिडीओ पाकिस्तानमधील लाहोर येथे अफगाणिस्तान व इंग्लड यांच्यादरम्यान झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील सामन्यावेळीचा असल्याचे समजते.

विराटची लोकप्रियता पाकिस्तानातही आहे. काही दिवसांपूर्वी दुबईत झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पाकिस्तानविरुद्धच्या भारताच्या महत्त्वाच्या सामन्यात पाकिस्तानमधील लोकांचे विराटबद्दलचे प्रेम पहायला मिळाले. पाकिस्तानी संघाच्या पराभवानंतरही २३ फेब्रुवारी रोजी पाक चाहते विराटने शतक पूर्ण केल्यानंतर आनंद व्यक्त करतानाचे व्हिडीओ समोर आले होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com